**JAYDEEP B. KULKARNI**

B.E. (Civil), MIE, FIV
Chartered Engineer & Approved Valuer

**Office :** Shop No. 1, Runanubandh Renuka, Prof. Colony Chowk, Savedi, Ahmednagar - 414003. | Mo. : 9822049099

**Resi. :** "Shubham", Suyog Grih Mandal, Neal Prof. Colony, Savedi, Ahmednagar - 414 003
Tel. : (0241) 2422459

RNI No. 6153/57

# समाचार
SAMACHAR

अत्याधुनिक नेत्र शिबीर
चष्मा नको? आता चष्मा घालवा कायमचा
डॉ. कांकरियांचे
साई सूर्य नेत्रसेवा
दृष्टी साजरी करा
मोफत नेत्रतपासणी सवलतीच्या दरात शस्त्रक्रिया
* शनिवार सकाळी १० ते १ * नांवनोंदणी आवश्यक
* कॉन्टयूरा व्हिजन * मोतिबिंदू * काचबिंदू * नेत्ररोपण
* एशियन आय हॉस्पीटल, पुणे * साई दृष्टी हॉस्पिटल, मुंबई
आंतरराष्ट्रीय कीर्तिच्या नेत्रतज्ञांची टीम
लेसर नेत्रशस्त्रक्रियेचा जागतिक विक्रम
आंतरराष्ट्रीय कीर्तिचे भारतातील ४० वर्षे अनुभवी केंद्र
वर्धमान, माणिक चौक, अहमदनगर ४१४००१
Email : saisuryaa85@yahoo.com
www.saisuryasupervision.com
Help line 9112288611 Appointment 8888982222

■ Volume - 72 ■ Issue- 285 ■ Marathi Daily ■ Thursday 25/7/2024 ■ Pages - 6 ■ Price- Rs. 3

अग्रलेख: भाजपची संयत पावले... पान २




एव्हरेस्ट अॅबॅकस अॅकॅडमीची राष्ट्रीय स्पर्धा संपन्न पान ५



आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये ऑगस्ट महिन्यात मोफत तपासणी शिबीर पान ६

**उठाठेव**



यंदा 'देशात सुका दुष्काळ पडेल' अशी शक्यता लक्षात घेऊन अनेक आंदोलनं, मोर्चे यांचे नियोजन केलं होतं, त्यावर या पावसानं चक्क पाणी सांडलं!!

## उड्डाणपूल धोकादायक वळण
# अपघात होतात; उपाय कधी?



**समाचार/नगर-दि.२५**

शहरातील उड्डाणपुलावरून मालवाहतुकीचा टेम्पो (एमएच २० जीसी ६४५०) खाली कोसळून झालेल्या अपघातात चालक ठार झाला तर क्लिनर जखमी झाला. अपघात बुधवारी दुपारी चारच्या सुमारास झाला. दोन वर्षांपूर्वी उभारलेल्या या उड्डाणपुलावरील वळणावर वारंवार अपघात होत आहेत. आत्तापर्यंत येथील अपघातात चौघांचा मृत्यू झाला आहे.

जळगावहून छत्रपती संभाजीनगर मार्गे पुण्याकडे भरधाव वेगात जाणाऱ्या टेम्पो चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले व उड्डाणपुलाचा कठडा तोडून टेम्पो खाली कोसळला. वाहनात पीव्हीसी पाईप व प्लंबिंगचे सुटे भाग होते. अपघातात चालकाचा जागीच मृत्यू झाला असून एक जण अत्यवस्थ आहे. असे असले तरी ट्रक जिथे कोसळला तिथे सुदैवाने कुणीही नव्हते, अन्यथा मोठा अनर्थ ओढवला असता.

झालेला अपघात आणि त्यातील एकाचा मृत्यू ही घटना अत्यंत दुर्दैवी आहे. परंतु त्यामुळे उड्डाणपूल संबंधी अनेक प्रश्न पुन्हा ऐरणीवर आले आहेत. पुणे आणि संपूर्ण मराठवाडा, खानदेश तसेच विदर्भाकडे जाणारी वाहतूक नगर शहरातून जाते. त्याच बरोबर दक्षिण भारतातून सोलापूरकडून येणारी सर्व वाहतूक उत्तर भारतात जाण्यासाठी नगर शहरातून जावे लागते. त्यामुळे शहरातील स्टेशन रस्ता हा नेहमी वर्दळीचा होता. नेहमी या रस्त्यावर मोठ्या वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागत होते. त्याला पर्याय म्हणून उड्डाण उड्डाणपुलाची निर्मिती करण्यात आली. स्टेशन रस्त्यावरील चांदणी चौक ते सक्कर चौक असे सर्व वाहतुकीचे चौक पार करता यावे म्हणून अशोका हॉटेलपासून तर सत्कार चौकापर्यंत जवळपास तीन किलोमीटर लांबीच्या या पुलाची निर्मिती करण्यात आली. या उड्डाणपुलाची निर्मिती करतानाच शहराबाहेरून बाह्य वळण रस्त्याकडे देखील लक्ष देऊन तो देखील जवळपास पूर्ण करण्यात आला. (पान ३ वर)

### अपघात टाळण्यासाठी
- वेग मर्यादेसंबंधी सूचना फलक असावे
- वेग मर्यादा वळणावर ताशी २० कि.मी. एवढीच असावी.
- वेगावर नियंत्रण ठेवण्यासाठी गतिरोधक असावे
- वेग मोजण्यासाठी स्पीड गन लावण्यात याव्यात.
- **अपघातजन्य धोकादायक वळण** असा फलक असावा.
- अवजड वाहतूक बंद करावी





**उड्डाणपूलावर जाण्यासाठी कोणाला मनाई आहे त्यासंबंधीचा फलक पुलापाशी लावण्यात आलेला आहे. मात्र तो इंग्रजीत असल्याने ज्यांना मनाई केली आहे त्यांना तो कसा समजणार?**

## निवडक
### ज्येष्ठ साहित्यिक फ्रान्सिस दिब्रिटो यांचे निधन



**मुंबई, दि. २५–** साहित्यिक व पर्यावरणवादी चळवळीतील लढवय्ये कार्यकर्ते असलेले फादर फादर फ्रान्सिस दिब्रिटो यांचे दीर्घ आजाराने निधन झाले. ते ८२ वर्षांचे होते. मागील काही वर्षांपासून ते आजारी होते. वसईत त्यांनी आज पहाटे पाच वाजण्याच्या सुमारास राहत्या घरी अखेरचा श्वास घेतला. फादर फादर फ्रान्सिस दिब्रिटो हे धाराशीव (उस्मानाबाद) येथे पार पडलेल्या ९३ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होते. त्यांच्या निधनाने मराठी साहित्य विश्वासोबत पर्यावरण चळवळीवर शोककळा पसरली आहे. फादर फ्रान्सिस दिब्रिटो हे ख्रिस्ती धर्मगुरू असले तरी त्यांची खरी ओळख ही पर्यावरणप्रेमी, पर्यावरणाचे रक्षणकर्ते, गुंडशाहीविरोधात आवाज उठवणारे कार्यकर्ते अशीच राहिली आहे. पालघर जिल्ह्यातील वसई तालुका आणि जवळपासच्या परिसरात त्यांनी सातत्याने पर्यावरणाच्या बाजूने भूमिका घेतली. 'सुवार्ता' या मासिकाद्वारे त्यांनी सामाजिक प्रबोधनाचे अनेक वेगवेगळे विषय मांडले आणि काही उपक्रमही राबवले.

## स्वीय सहाय्यकाचा जामीन अर्ज फेटाळला

**समाचार/नगर-दि.२५**

लाचखोरीचा गुन्हा दाखल झालेले महापालिकेतील आयुक्तांचे स्वीय सहायक श्रीधर देशपांडे यांचा अटकपूर्व जामीन अर्ज जिल्हा सत्र न्यायालयाने बुधवारी फेटाळला. विशेष न्यायाधीश निरंजन नाईकवाडे यांनी यासंदर्भातील आदेश दिला.

श्रीधर देशपांडेच्या वतीने युक्तिवाद करताना वकील महेश तवले यांनी सांगितले की, तक्रारदार व देशपांडे यांची ओळखच नव्हती. तक्रारदाराकडूनच रक्कम स्वीकारण्याचा आग्रह धरला जात होता. सरकारी वकील सी. डी. कुलकर्णी व तक्रारदाराचे वकील अभिजीत पुप्पाल यांच्या वतीने युक्तिवाद करताना सांगण्यात आले की, देशपांडे यांच्या घरात ९ मालमत्तांचे खरेदीखत, ९७ हजारांची दागिने आढळले आहेत. त्यामुळे चौकशीसाठी कोठडी आवश्यक आहे.

दोन्ही बाजूचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने देशपांडेचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळला.


## नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा
# जिल्ह्यातील धरणांमधून मोठा विसर्ग

**समाचार/नगर-दि.२५**

गेल्या काही दिवसांपासून राज्यातील धरण क्षेत्रात अतिवृष्टी होत असून धरणांमध्ये मोठ्या प्रमाणात पाण्याची आवक होत आहे. काही धरणे १०० टक्के भरत आली आहेत तर काही भरण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे धरणांमधून मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग करण्यात येत आहे.

नगर जिल्ह्यातील मुळा व भंडारदरा धरणातील पाणलोट क्षेत्रात मुसळधार पाऊस सुरू आहे. गेल्या तीन दिवसात पाण्याची मोठी आवक दोन्ही धरणात सुरू आहे. मुळा धरण ५० टक्के भरण्याच्या मार्गावर असून भंडारदरा धरण ६५ टक्के भरण्याच्या मार्गावर आहे. गत २४ तासांमध्ये भंडारदरा येथे १६० मिमी, घाटघर येथे २७० मिमी,रतनवाडी येथे २८५ मिमी तर पांजरे येथे २५५ मिलिमीटर पाऊसाची नोंद झाली आहे. निळवंडे येथे ७१ मिलिमीटर तर आढळा धरणावर ३ मिलिमीटर पावसाची नोंद झाली असून आढळा धरण ५२.६४ टक्के भरले असून निळवंडे धरण ३० टक्के भरत आले आहे. सलग दोन तीन दिवसांपासून पावसाचा जोर टिकून आहे. प्रचंड वारा आणि पाऊस यामुळे या परिसरातील जन जीवन विस्कळीत झाले आहे.

दरम्यान प्रशासनाकडून आलेल्या माहिती नुसार जिल्ह्यात आजपर्यंत एकूण ३१५.१० मिमी पाऊस पडला असून तो जून ते सप्टेंबर सरासरी पर्जन्याच्या ७० टक्के इतका आहे. आज सकाळी १० वाजल्यापासून जिल्ह्यातून वाहणाऱ्या नद्यांमधून पाण्याचा मोठा विसर्ग सुरू झाला आहे. नांदूर मधमेश्वर धरणातून गोदावरी नदीत ८८०४ क्युसेक्स, प्रवरा भंडारदरा (पान ३ वर)



## स्थानिक गुन्हे शाखेच्या भ्रष्ट कर्मचाऱ्यांविरोधात आंदोलन
# खा. लंके यांचे गंभीर आरोप; रेटकार्ड केले जाहीर



**समाचार/नगर-दि.२५**

स्थानिक गुन्हे शाखेच्या भ्रष्ट अधिकारी व कर्मचाऱ्यांच्याविरोधात खा. निलेश लंके यांनी दि. २२ जुलैपासून जिल्हा पोलिस अधीक्षक कार्यालयाच्या बाहेर उपोषण आंदोलन सुरू केले आहे. आज आंदोलनाचा चौथा दिवस आहे. खा. लंके यांनी स्थानिक गुन्हे शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर गंभीर आरोप करत त्यांच्या तथाकथित हप्तेखोरीचे रेटकार्ड जाहीर केले. पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी, कर्मचारी यांच्याकडून दरमहा २७ कोटी ६० लाख रुपयांचे हप्ते वसूल करण्यात येत असल्याची धक्कादायक माहिती खा. निलेश लंके यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी बोलताना खा. लंके म्हणाले, संपूर्ण पोलिस दल या दोन टक्के हप्ते वसुली करणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांमुळे बदनाम झाले आहे. ते अवैध धंद्यांना पाठीशी घलितात. खुनाचा तपासही लागत नाही. राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र फाळके म्हणाले, खा.लंके यांच्या उपोषणाला तीन दिवस झाले तरी पोलिस अधीक्षक भेटीसाठी येत नाहीत. सकारात्मक चर्चा होत असताना वरिष्ठ अधिकारी मात्र वेगळाच प्रस्ताव देतात. भ्रष्टाचाराला पाठीशी घालण्याचे काम वरिष्ठ अधिकारी करत आहेत का? या आंदोलनाकडे दुर्लक्ष झाल्यास राज्यपातळीवर हे आंदोलन नेले जाईल. आता आयुक्त दर्जाच्या अधिकाऱ्यांशी आम्ही चर्चा करू. दरम्यान, खा. लंके यांनी केंद्र सरकारला याबाबत कळवले असल्याचे समजते.

> दरम्यान, माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी खा. लंके यांची उपोषणस्थळी भेट घेतली. आ. थोरात यांनी पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला यांच्याशी यासंदर्भात चर्चा केली असता १५ दिवसात तक्रारींची निःपक्ष चौकशी करण्याची ग्वाही त्यांनी दिली. नाशिक विभागाचे आयजी दत्ता कराळे यांच्याशी देखील आ. थोरात यांनी फोनवर चर्चा झाल्यानंतर चौकशी अधिकारी नेमण्यात येणार असल्याचे समजते. त्यामुळे उपोषण संपण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

# क्रेडिट कार्डवरून फसवणूक; दोन लाखाला घातला गंडा

**समाचार/नगर-दि.२५**

एका खाजगी बँकेच्या नावे आलेल्या बनावट फोनला प्रतिसाद दिल्याने नोकरदार व्यक्तीच्या क्रेडिट कार्डवरून दोन लाख, तीन हजार ३०४ रूपये खात्यातून ऑनलाईन गेल्याची घटना घडली. सुदीप याकोब साळवे (वय ४० रा. कायनेटीक चौक, नगर) हे गेल्या शनिवारी (२० जुलै) दुपारी नगरमधील घरी असताना त्यांच्या मोबाईल नंबरवर एक अनोळखी व्यक्तीने फोन केला. फोन करणाऱ्या व्यक्तीने फिर्यादी यांना एका अग्रणी बँकमधून आलोक सिंगला बोलत असल्याचे सांगितले व तुमच्या 'क्रेडिट कार्डचा सीपीपी' काढून टाकायचा आहे त्यासाठी बँकेचे अॅप डाऊनलोड करा, असे सांगितले. फिर्यादी यांनी त्या व्यक्तीवर विश्वास ठेऊन बँकेचे अॅप मोबाईलमध्ये डाऊनलोड केले. काही वेळातच त्यांच्या क्रेडिट कार्डवरून एक लाख एक हजार ६५२ रूपये कट झाल्याचा मेसेज आला. काही वेळानंतर पुन्हा एक लाख एक हजार ६५२ रूपये कट झाल्याचा मेसेज आला. फिर्यादी यांनी त्या व्यक्तीला क्रेडिट कार्डवरून पैसे कट झाल्याचे सांगितले असता त्याने तुमचे पैसे २४ तासात तुमच्या क्रेडिट कार्डवर पुन्हा जमा होतील असे सांगितले.



## चीनची अर्थव्यवस्था अडचणीत
# अनेक मोठ्या कंपन्या भारतात

**नवी दिल्ली, दि. २५–** चीनला जगातील सर्वात मोठी दुसरी अर्थव्यवस्था बनवण्यात मोठा वाटा असलेल्या 'ग्लोबल कंपन्या' आता चीनमधील अस्वस्थ सामाजिक परिस्थितीमुळे भारताकडे वळत आहेत.

चीनची अर्थव्यवस्था सुस्तावली असून युरोप आणि अमेरिकेसोबत चीनचा तणाव वाढत आहे. त्यामुळे प्रगत राष्ट्रे चीनवरील अवलंबित्व कमी करू इच्छितात. 'ग्लोबल कंपन्या' आपली मॅन्युफॅक्चरिंग युनिट्स चीनहून भारतात हलवत आहेत. चीनऐवजी इतर रदेशांमध्ये नवे कारखाने सुरू करत आहेत. भारत ही या कंपन्यांची पहिली पसंती आहे. जपानची वित्तीय कंपनी 'नोमुरा'नुसार चीनमध्ये मॅन्युफॅक्चरिंग बेस असलेल्या १३० जागतिक कंपन्यांपैकी सर्वाधिक २८ कंपन्या आपली उत्पादन युनिट भारतात हलवू इच्छितात.

'ग्लोबल कंपन्यां'च्या पसंतीमध्ये व्हिएतनाम दुसऱ्या तर मेक्सिको तिसऱ्या क्रमांकावर आहे. २०१९ मध्ये चीनमधून ग्लोबल कंपन्यांचे स्थलांतर सुरू झाले. 'ग्लोबल कंपन्या' भारतात आल्यास निर्यात २०३० पर्यंत वाढून ८३५ डॉलर्स (सुमारे %० लाख कोटी रुपये) पर्यंत वाढू शकते. ही वार्षिक दहा टक्के वाढ आहे. २०२३ मध्ये भारताने ४३१ अब्ज डॉलर्सची (सुमारे ३६ लाख कोटी रुपये) निर्यात केली होती.

गेल्या वर्षी 'अमेरिकी चेंबर ऑफ कॉमर्स'ने चीनमध्ये चालवण्यात येणाऱ्या अमेरिकन कंपन्यांची पाहणी केली. त्यात ४० टक्के कंपन्या अमेरिका–चीनमधील तणावामुळे इतर देशांमध्ये स्थलांतरित होऊ इच्छितात, असे आढळले होते. त्यांच्यासाठी भारत हा चांगला पर्याय आहे. याचे कारण भारत हा मागणी, खप आणि लोकसंख्येत चीनसारखा आहे. कपाशी, लोखंड, केमिकल्ससारखा कच्चा मालही भारतात मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे. जगातील सर्वात मोठी रिटेल कंपनी वॉलमार्टही भारतात विस्तार करणार असून २०२७ पर्यंत भारतीय पुरवठादारांबरोबर आपली खरेदी १० अब्ज डॉलर्सपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट ठेवू पहात आहे. २०२० मध्ये ती तीन अब्ज डॉलर्स होती. उत्तर अमेरिका व युरोपीय देशांच्या रिटेलर्सनी काही दिवसांपूर्वी उत्तर प्रदेशमध्ये कारखाना (पान ३ वर)

समाचार
नगर जिल्ह्यातील विश्वासार्ह व प्रथितयश

**सायंदैनिक समाचारसाठी हवे आहेत – पार्टटाईम**

*** शहर वार्ताहर ***
**सावेडी/केडगाव/भिंगार/एम.आय.डी.सी.**

वृत्तपत्र क्षेत्रातील पदवी/पदविका अथवा वृत्तपत्र/अन्य लेखनाचा अनुभव आवश्यक. आपल्या परिसरातील सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक घडामोडींची माहिती आणि उत्तम जनसंपर्क असल्यास प्राधान्य.
**स्वहस्ताक्षरातील अर्ज येथे पाठवावेत.**

**दैनिक समाचार**
लक्ष्मी कारंजा, आनंदी बाजार,
अहमदनगर

(संपादकीय)

# 'डॅमेज कंट्रोल'चे प्रयत्न तेजीत...

मित्रपक्षांच्या मदतीने केंद्रात सरकार स्थापल्यानंतर उत्तर प्रदेशसारख्या मोठ्या राज्यामध्ये बसलेल्या फटक्यामुळे भाजप बैठकांमागून बैठका घेत आहे. निवडणुकांमध्ये झालेल्या चुकांबद्दल आत्मचिंतन केले जात आहे. मुस्लीम–दलित मते भाजपपासून दुरावली आहेत. समाजवादी पक्ष आणि काँग्रेसच्या कार्यकर्त्यांचे चांगलेच मनोमिलन झाले आहे. लोकसभेच्या विरोधी पक्षनेतेपदी आल्यानंतर राहुल गांधी यांनी उत्तर प्रदेशमध्ये वारंवार दौरे सुरू केले असले, तरी त्यात कुठेही ते काँग्रेसला श्रेय देत नाहीत. अखिलेश आणि राहुल यांच्या विचारांचे चांगले ट्युनिंग जुळले आहे. असे असताना पराभवानंतर मात्र भाजपमधील अंतर्गत नाराजी दूर कशी करायची, हा मोठा प्रश्न भाजपपुढे आहे. लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर उत्तर प्रदेशमधील राजकीय वर्तुळातील खळबळ थांबलेली नाही. भाजप सतत निवडणूक निकालांचा आढावा घेण्यात व्यस्त आहे. तळागाळातील खराब कामगिरीची कारणेही तपासत आहे. या पार्श्वभूमीवर उत्तर प्रदेशमध्ये लवकरच होऊ घातलेली पोटनिवडणूक भाजपसाठी आव्हानात्मक ठरत आहे. लोकसभा निवडणुकीत उत्तर प्रदेशमध्ये एनडीए आघाडीला राज्यात ८० पैकी केवळ ३६ जागा जिंकता आल्या. दुसरीकडे उत्तर प्रदेशमध्ये लोकसभेच्या ४३ जागा जिंकल्यानंतर विरोधी पक्ष मोठ्या उत्साहात आहेत. आगामी काळात उत्तर प्रदेशमध्ये दहा जागांवर विधानसभेची पोटनिवडणूक होणार आहे. लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर या निवडणुका भाजपसाठी अत्यंत महत्त्वाच्या आहेत; मात्र पोटनिवडणुकीपूर्वीच पक्षश्रेष्ठींच्या काही वक्तव्यांमुळे निवडणुकीतील आव्हान वाढणार आहे. लोकसभा निवडणुकीनंतर भाजपच्या राज्य कार्यकारिणीची पहिली बैठक लखनौमध्ये झाली. या बैठकीला दोन्ही उपमुख्यमंत्र्यांसोबत भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डाही उपस्थित होते; मात्र बैठकीत सर्वांनी एक एक करून आपली मते मांडली. लोकसभा निवडणुकीत उत्तर प्रदेशमध्ये भाजपला पराभव का सोसावा लागला यावर सविस्तर चर्चा झाली आणि २०२७ च्या विधानसभा निवडणुकीसाठी ठोस कार्यक्रम ठरवण्यात आला. त्यानुसार मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांची पक्षातील ताकद कमी होणार नसून आणखी वाढणार असल्याचे स्पष्ट झाले. असे असले, तरी योगी आणि केशवप्रसाद मौर्य यांच्यात सुरू असलेला संघर्ष अद्याप संपलेला नाही, हेही पुन्हा सिद्ध झाले आहे. २०२७ च्या विधानसभा निवडणुकीतील जागावाटपाची संपूर्ण जबाबदारी योगी आदित्यनाथ यांच्या खांद्यावर आली आहे. योगी आणि केशवप्रसाद यांचे पटत नाही. सरकारपेक्षा संघटना मोठी असल्याचा पुनरुच्चार केशवप्रसाद यांनी केला आहे. मौर्य यांनी अप्रत्यक्षपणे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्याकडे बोट दाखवले. ते दोघेही एकमेकांना अप्रत्यक्षपणे टार्गेट करत आहेत. लोकसभा निवडणुकीतील अपयशानंतरही त्यांच्यातील शीतयुद्ध अजून थांबायला तयार नाही. २०१७ मध्ये उत्तर प्रदेशचा मुख्यमंत्री ठरवण्यासाठी पक्षात चर्चा सुरू असताना योगी यांची निवड केली. याबाबत पक्षाने अनेक समीकरणांकडे लक्ष वेधले आणि योगी हे नैसर्गिक उमेदवार म्हणून समोर आले. याचे कारण म्हणजे ते योगी होते आणि दुसरे म्हणजे कट्टर हिंदुत्वाकडे वाटचाल करण्यासाठी भाजपमध्ये होत असलेल्या प्रयत्नांचे ते प्रतीक होते. २०२२ मध्ये भाजपचा योगींना मुख्यमंत्रिपदावरून हटवण्याचा विचार होता. परंतु हा निर्णय उलटवण्यात योगी यशस्वी झाले. अलिकडे योगींची लोकप्रियता फार वाढली होती. त्यांना इतर राज्यांमधूनही प्रचारासाठी बोलावले जात होते. मूल्यमापनानंतर पक्षाच्या सर्वोच्च नेतृत्वाला वाटले, की योगींना हटवण्याची ही योग्य वेळ नाही. २०२२ च्या निवडणुका योगींच्या नेतृत्वाखाली लढल्या गेल्या. त्यात भाजपचा विजय झाला. अलिकडे मात्र भाजपने नेतृत्वाची धुरा पुन्हा एकदा योगी यांच्याकडे दिल्यामुळे मौर्य यांच्यासह अन्य नेते नाराज झाले आहेत. लोकसभा निवडणुकीत यशाची चव चाखल्यानंतर काँग्रेस आरक्षणाचा मुद्दा सोडू इच्छित नाही. आता आगामी काळात आरक्षणाच्या मुद्याला आणखी धार देण्याची काँग्रेसची तयारी आहे. यासाठी पक्ष शैक्षणिक आणि वैद्यकीय संस्थांमधील नियमित भरती तसेच कंत्राटी आणि आऊटसोर्सिंग भरतीमध्ये आरक्षण मिळावे, यासाठी आंदोलन करणार आहे. उत्तर प्रदेशमध्ये 'इंडिया' आघाडीला मिळालेल्या यशामागील प्रमुख कारण म्हणजे आरक्षण. या रणनीतीअंतर्गत काँग्रेसचा मागासवर्ग विभाग आरक्षणाकडे दुर्लक्ष झाल्यासंदर्भातील प्रकरणे गोळा करत आहे. राहुल गांधी आणि पक्षाच्या राष्ट्रीय सरचिटणीस प्रियांका गांधी मागासवर्गीय, दलित आणि अल्पसंख्याकांच्या आरक्षणाचा मुद्दा सभागृहापासून रस्त्यापर्यंत सर्वत्र मांडत आहेत. राज्यातील आरक्षणाकडे दुर्लक्ष झाल्याबाबतचे पुरावे राहुल गांधी यांना पाठवले जाणार आहेत. हा मुद्दा ते सभागृहात मांडणार आहेत. संविधान वाचवण्याच्या मुद्यानंतर काँग्रेस आरक्षणासंदर्भात चर्चा घडवून आपली राजकीय धार कायम ठेवण्याचा प्रयत्न करत आहे. यामध्ये आरक्षणाचा मुद्दा महत्त्वाचा आहे. लोकसभा निवडणुकीमध्ये हा मुद्दा जसा फायदेशीर ठरला, तसाच आगामी विधानसभा निवडणुकीतही प्रभावी ठरू शकतो. त्यामुळेच पक्षाच्या सर्वोच्च नेतृत्वाने मागासवर्गीय विभागाला या प्रकरणाला हवा देण्याचे निर्देश दिले आहेत. लोकसभा निवडणुकीमध्ये थोडे बळ मिळाल्यानंतर काँग्रेस राज्यात आपले राजकीय मैदान शोधण्यात व्यस्त आहे. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी रायबरेलीचा दौरा करताना हुतात्मा अंशुमन सिंह यांच्या पालकांची भेट घेतली आणि त्यांच्याशी अग्निवीर योजनेवर चर्चा केली. त्याआधी हाथरस घटनेत उत्तर प्रदेश काँग्रेसचे प्रमुख अजय राय पीडितांच्या कुटुंबीयांना भेटायला आले आणि दुसऱ्याच दिवशी राहुल यांनी मृतांच्या कुटुंबीयांची भेट घेतली. आपला जनाधार वाढवत असताना काँग्रेस समाजवादी पक्षालाही दुखवू इच्छित नाही. समाजवादी पक्ष आणि काँग्रेसची आघाडी भाजपला टक्कर देण्यास सज्ज झाली असताना भाजप हे आव्हान कसे पेलणार, हे पाहणे महत्त्वाचे आहे.

# विशाल गणेश मंदिरास झंवर परिवाराची मदत



**समाचार/नगर-दि.२५**

शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणपती मंदिरात प्रत्येक संकष्टी चतुर्थीला श्री गणेशयाग करण्यात येतो. बुधवार दि.२४ जुलैला झालेल्या गणेशयागाचे यजमान श्रीनिवास झंवर यांनी मंदिराच्या जीर्णोद्धार कार्याला रुपये १ लाख २१ हजारांची देणगी स्व.ताराबाई झंवर यांच्या स्मरणार्थ दिली.

आम्ही नित्याने ग्रामदैवत विशाल गणेशची भक्ती करीत आहोत. आज देवास्थाच्या ट्रस्टींनी गणेशयाग करण्याची संधी आम्हाला दिल्याबद्दल आम्ही सर्वांचे ऋणी आहोत.

श्री विशाल गणपती मंदिराचे खजिनदार पांडुरंग नन्नवरे, विश्वस्त माणिक विधाते, नितीन पुंड यांनी श्रीनिवास झंवर यांचा सत्कार करून देणगी दिल्याबद्दल आभार मानले. यावेळी नर्मदाबाई झंवर, अनिल झंवर, मंगल झंवर, अरुण झंवर, राजगोपाल झंवर, मनीष झंवर, भारती झंवर, मुकुंद झंवर, डॉ. राहुल झंवर, मिनल झंवर, सिद्धार्थ झंवर, वैष्णवी झंवर, पीयूष झंवर, प्रीती झंवर, डॉ. अनिकेत घोटणकर, प्रीतेश दुगड, सिद्धी झंवर, पार्थ झंवर, नचिकेत झंवर, वेदिका झंवर, हृद्या झंवर, पहल झंवर आदी उपस्थित होते.

# शिक्षकांना निवड श्रेणी लागू करावी- गाडगे

**समाचार/नगर-दि.२५**

राज्यातील खासगी अनुदानित शाळांतील डीएड किंवा बीएड अर्हताधारक शिक्षकांना सरसकट निवडश्रेणी लागू करावी यासाठी शिक्षक भारती संघटनेच्या वतीने राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर आणि शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिवांकडे पत्राद्वारे केली आहे.

राज्यातील सर्वच विभागातील कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मिळतो; परंतु शिक्षकांना तो मिळत नाही. म्हणूनच अर्हताधारक शिक्षकांना सरसकट निवडश्रेणी लागू करावी, अशी मागणी शिक्षक भारती संघटनेच्या वतीने केल्याची माहिती शिक्षक भारतीचे राज्य सचिव तथा शिक्षक नेते सुनील गाडगे यांनी दिली.

राज्यातील खासगी अनुदानित शाळांतील डीएड किंवा बीएड अर्हताधारक शिक्षकांना सरसकट निवडश्रेणी लागू करावी अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा शिक्षक नेते तथा शिक्षक भारतीचे राज्य सचिव सुनिल गाडगे जिल्हाध्यक्ष आप्पासाहेब जगताप, अहमदनगर महिला जिल्हाध्यक्षा आशा मगर, सोमनाथ बोंतले, जिल्हा कार्याध्यक्ष बाबासाहेब लोंढे तसेच इतर पदाधिकाऱ्यांनी दिला.

# पिण्याच्या पाण्याची काळजी घ्या

'नेहमीच येतो मग तो पावसाळा' किती समर्पक अशी ही उक्ती आहे. खरं तर आपल्या उष्णकटिबंधात असलेल्या भारताला उन्हाच्या तावडीतून सुटका करून घेण्यासाठी पावसाची आतुरतेने वाट पाहणे गरजेचे ठरते.

यंदाही आपण वरूणराजाची वाट पाहिली व अजुनही तो म्हणावा तसा आलाच नाही. जुलै महिना जवळजवळ संपत आला आहे परंतु नगर शहरात म्हणावा तसा पाऊस नाहीच.

नगरकरांचे नशीब, दरवर्षी रतनगड, अकोला येथे अतिवृष्टी होते व त्याचाच परिणाम म्हणजे नगरकरांची तष्णा भागवणारे मुळा धरणात पाण्याची चांगली आवक चालू आहे.



**विज्ञान भारती**

पावसाळ्याच्या सुरुवातीला दरवर्षी होणारा त्रास म्हणजे नळावाटे येणारे गढुळ पाणी. हे पाणी विविध साथीच्या रोगाला कारणीभूत ठरते. दरवर्षी याकरता मोठ्या प्रमाणावर जनजागृती करण्यात येते. सरकार, महानगरपालिका, नगरपालिकेतर्फे नागरिकांना काळजी घेण्याबाबत सूचना देण्यात येतात.

खरे तर डोंगराच्या कानाकपारीतून वाहणारे हे पाणी त्यांच्याबरोबर अनेक प्रकारची घाण धरणात आणतात. येणाऱ्या पाण्याच्या वेगवान लोंढ्यामुळे संपूर्ण धरणातील पाणी एक प्रकारे ढवळून निघते.

पावसाळ्याच्या सुरुवातीला म्हणूनच पाणी उकळून गार करून पिण्याचा सल्ला दिला जातो. खरे तर ही सर्वात योग्य अशी पद्धत आहे, मात्र विविध कारणामुळे ती मोठ्या प्रमाणात प्रत्यक्षात आणणे अवघड आहे.

आजकाल घरोघरी पाण्याचे शुद्धीकरण यंत्र आहे. काही जणांकडे युव्ही लाईट, नॅनो व कार्बन फिल्टर असलेले यंत्र आहे. तर काही जणांकडे 'आर ओ' प्रकारातील शुद्धीकरण यंत्र आहे.

महानगरपालिकेसारख्या मोठ्या यंत्रणेमध्ये पाण्याचे शुद्धीकरण ब्लिचिंग पावडरने होते. ब्लिचिंग पावडर ही क्लोरीन या वायूचे व्यावसायिक स्वरूपात रूपांतरित केलेली पावडर आहे. या पावडरला वैज्ञानिक भाषेत कॅल्शियम हायपोक्लोराइट असे म्हणतात.

आपणास क्लोरीन गॅस तीन प्रकारात मिळतो. गॅस म्हणून, ब्लिचिंग पावडर म्हणून व सोडियम हायपोक्लोराइड द्रव स्वरूपात. यामध्ये क्लोरीनचे प्रमाण वेगवेगळ्या स्वरूपात असते. ब्लिचिंग पावडर मध्ये वीस ते तीस टक्के क्लोरीन असतो.

सर्वसाधारणपणे एक लिटर पाणी शुद्ध करण्यासाठी चार मिलिग्रॅम ब्लिचिंग पावडर वापरली जाते. ही ब्लीचिंग पावडर पाण्याशी संयोग पावून कॅल्शियम हायड्रॉक्साइड व हायपोक्लोरोस ऍसिड तयार करते व पुढे त्याचे विघटन होऊन क्लोरीन गॅस तयार होतो.

क्लोरीन गॅस पुढे पाण्यातील जीवाणू विषाणूंचा नायनाट करतो. दूषित पाण्यामुळे पसरणाऱ्या कॉलरा सारख्या अनेक जीवांना ब्लीचिंग पावडर खत्म करते. थोडक्यात काय पावसाळ्याच्या सुरुवातीच्या दिवसांमध्ये पिण्याच्या पाण्याची काळजी घेणे गरजेचे आहे. ज्यांच्या घरी यंत्र आहेत त्यांनी ती सर्विसिंग करून घेतली पाहिजेत. ज्यांच्या घरी नाही त्यांनी कमीत कमी पाणी गरम करून किंवा आलम म्हणजे तुरटी पाण्यामध्ये फिरवून ते पाणी पिले पाहिजे जेणेकरून पाण्यामुळे कुठलेही रोग पसरणार नाही.

**- डॉ.दत्ता पोंदे**

मोबाईल– ७३८७९००७००





## राशीभविष्य

- **मेष** : वैद्यकीय कारणांसाठी खर्च होईल. प्रवास शक्यतो टाळावा. व्यवसायात साधारण स्थिती राहील.
- **वृषभ** : नोकरीत जबाबदाऱ्या वाढतील. कौटुंबिक समस्यांचा ताण राहील. ज्येष्ठांनी प्रकृती सांभाळावी.
- **मिथुन** : खर्चाचं योग्य नियोजन करा. कायदेशीर बाबतीत काळजी घ्यावी. जुनी येणी वसूल होतील.
- **कर्क** : आर्थिक बाबतीत दिलासा मिळेल. मनाजोग्या घटना घडतील. कामासाठी प्रवास लभदायी ठरेल.
- **सिंह** : व्यवसायात चिंता राहील. आर्थिक व्यवहारात फसवणूक संभवते. विद्यार्थ्यांची प्रगती होईल.
- **कन्या** : महत्त्वाच्या निर्णयांना विलंब नको. थोरामोठ्यांचा सहवास लाभेल. सरकारी कामांना गती येईल.
- **तूळ** : नव्या कामांचा उत्साह राहील. गृहसजावटीच्या क्षेत्रात अनुकूलता लाभेल. बाकी चिंता करू नये.
- **वृश्चिक** : उपजत गुणांना वाव मिळेल. कार्यक्षमतेत वाढ होईल. स्थावर प्रश्न तुर्तास प्रलंबित राहतील.
- **धनु** : व्यवसायात चिंता राहील. उत्पन्न आणि खर्चाचा मेळ साधणार नाही. नव्या योजना तुर्तास नको.
- **मकर** : हितशत्रूंच्या कारवाया वाढतील. विचारपूर्वक पावलं टाकावीत. कुलदेवतेची उपासना करावी.
- **कुंभ** : सरकारी योजनांचा लाभ घ्या. जुनी दुखणी पुन्हा उद्भवतील. मुलांच्या प्रगतीत अडचणी येतील.
- **मीन** : दानधर्माकडे ओढा राहील. व्यवसायात महत्त्वाचा दिलासा मिळेल. मानसिक स्वास्थ्य लाभेल.

सल्ला मोलाचा

## पोटंट डायट

तुम्हाला माहीत आहे का? आज खाल्लेलं अन्न नव्वद दिवसांनंतर शुक्राणुंवर आणि अंड्यांवर परिणाम करणारं असतं. म्हणून काय खायला हवं हे महत्त्वाचं आहे तितकंच काय खायचं नाही हेदेखील महत्त्वाचं आहे. वंध्यत्वाच्या अनेक कारणांपैकी 'ओबेसिटी' आणि 'ओव्हरवेट' ही दोन महत्वाची कारणं आहेत. संतुलित आहारामुळे काही प्रमाणात वजन नियंत्रणात येण्यास आणि ते तसंच राखण्यात मदत होते. यासाठी अतिरिक्त प्रमाणातला चहा टाळायला पाहिजे. लिपोईक ॲसिड पुरेशा प्रमाणात घेतलं तर उपयुक्त ठरतं. कारण यामुळे रोप्रोडक्टिव्ह ऑर्गन्सचं आरोग्य सुधारतं. पुरूषांच्याबाबतीत शुक्रांणुंची गुणवत्ता सुधारते. तुमचा दिवसभराचा आहार असा असायला हवा. एक वाढप हिरव्या भाज्या, एक फळ, एक वाढप ईएफएयुक्त पदार्थ (जवस इत्यादी), एक–दोन अंडी, एक वाढप अक्रोड/बदाम/मनुक्का/पिस्ता/भोपळ्याच्या बिया/शेंगदाणे, पीठ न चाळता बनवलेली पोळी किंवा भाकरी (१–२) भरपूर पाणी आणि एक ग्लास ताक, एक ग्लास दूध साखर न घालता.

दिनविशेष

## २६ जुलै

- **२००९** : ज्येष्ठ संगीतकार भास्कर चंदावरकर यांचे निधन.
- **२०१५** : याकूब मेमनवर निर्दोषत्वाचा शिक्का मारणाऱ्या सलमान खानच्या ट्विटमुळे संतापाची लाट.
- **२०१७** : राज्यसभेच्या उमेदवारीसाठी अमित शहांची वर्णी.
- **२०१८** : भारत सरकारने कायदेशीर पद्धतीने मेहुल चोक्सी याच्या प्रत्यार्पणाची विनंती केल्यास त्यावर विचार होऊ शकतो, असे अँटिग्वा सरकारकडून सकारात्मक संकेत.

महत्त्वपूर्ण काही...

## अनोखी स्पर्धा

जगामध्ये नानाविध प्रवृत्तीच्या व्यक्ती आढळतात. आपल्या अनोख्या जीवनसरणीमध्ये त्यांच्या स्वभावातील गमतीजमती प्रतीत होतात. साजऱ्या होणाऱ्या स्पर्धांमधून किंवा सणांमधून त्यांची जिंदादिली समोर येते. दरवर्षी जर्मनीतल्या स्टुटगार्ड शहरात एक अनोखी स्पर्धा आयोजित होते. १९९९ मध्ये या स्पर्धेला सुरूवात झाली. स्पर्धेमध्ये स्पर्धक पिवळ्या रंगांची रबरी बदकं बरोबर घेऊन येतात. एखादा स्पर्धक बदक आणायला विसरला तर इथे भाड्यानं बदक मिळण्याचीही सोय आहे. प्रत्येक स्पर्धक आपल्या बदकावर नाव आणि पत्ता घालतं आणि पाण्यात सोडून देतं. नेकार नदीच्या पात्रात रबरी बदकांची ही अनोखी स्पर्धा रंगते. रबरी बदकाला जड करण्यासाठी खालून वजन लावलेलं असतं. अशा परिस्थितीमध्ये प्रवाहामध्ये कुठलं बदक पुढे जातं हे बघण्यासाठी सर्वच उत्सुक असतात. प्रत्येक जण आपल्या कृत्रिम बदकांना चिअर अप करत असतात. यावेळी मोठा आरडाओरडा होता. अखेर एका विशिष्ट रेषेपाशी स्पर्धा संपते. त्या रेषेजवळ सर्वप्रथम पोहोचणाऱ्या बदकाला भलंमोठं इनाम मिळतं.

आरोग्यमंत्र

## दातांच्या स्वच्छतेविषयी...

दात घासणं हे एक तंत्र आहे. दंतविकार टाळण्यासाठी दात योग्य पद्धतीने घासले पाहिजेत. याविषयी...

✻ अनेकजण एक मिनिटापेक्षाही कमी वेळ दात घासतात. मात्र यासाठी कमीत कमी दोन मिनिटं द्यायला हवी. दररोज दोनदा दात घासले पाहिजेत. ✻ दात घासण्याचा ब्रश फार मोठा नसावा. ब्रिसल्स मुलायम असले पाहिजे. ✻ दात बळकट करण्यासाठी फ्लोराइडयुक्त टूथपेस्टचा वापर करा. अशा टूथपेस्टमुळे दातांची झीज होत नाही. दात घासताना दातांचा बाहेरचा, आतला आणि वरचा भाग स्वच्छ झाला पाहिजे. पुढच्या दातांचा मागचा भाग वरून खाली या पद्धतीने घासा. ✻ दात घासताना जीभही स्वच्छ करा. यामुळे तोंडाची दुर्गंधी निर्माण करणाऱ्या बॅक्टेरियांचं प्रमाण कमी होईल. ✻ जेवल्यानंतर चूळ भरायला विसरू नका. त्यामुळे अडकलेले अन्नकण निघून जातात. बरेचदा दातांच्या फटींमध्ये अन्नकण अडकतात. हे अन्नकण ब्रशने स्वच्छ करता येत नाहीत. मात्र त्यांच्यामुळे दातांमध्ये बॅक्टेरियांची निर्मिती होते. बॅक्टेरियांमुळे दातांची झीज होते तसंच दातात फटी पडू लागतात. ✻ माउथवॉशचा अवश्य वापर करा. यामुळे दातांमध्ये अडकलेले अन्नकण बाहेर पडायला मदत होते. तोंडाची दुर्गंधी कमी होते. ✻ दर तीन ते चार महिन्यांनी टूथब्रश बदला. आजारपणात वापरलेला ब्रश तातडीने बदला. ✻ आरोग्यदायी पदार्थांचं सेवन करा. डेंटिस्टकडून नियमित तपासणी करून घ्या.



पंचांग

**शुक्रवार, २६ जुलै २०१९**
विकारीनाम संवत्सर, शके १९४१,
आषाढ कृ. ९, नक्षत्र : भरणी,
चंद्रराशी : वृषभ, शूल योग
सूर्योदय: ६.१६, सूर्यास्त: ७.१५

फॉरवर्डस

**एखाद्याच्या मनाचा थांग लागत नाही. कवी म्हणतो त्याप्रमाणे...**

वो मेरे हाल पे रोया भी,
मुस्कुराया भी
अजीब शख्स हैं अपना भी है,
पराया भी

स्मार्ट शॉपिंग

मुलांच्या खोलीत बंक बेड घेतेवेळी साचेबद्ध डिझाईनखेरीज आकर्षक डिझाईनमधल्या पर्यायांचा अवश्य विचार करा. सध्या बाजारात विविध मटेरिअलमध्ये तयार केलेले बंक बेड उपलब्ध नसून पायऱ्यांबरोबरच त्यात वॉर्डरोब अथवा डेस्कची व्यवस्थाही केलेली दिसते. बंक बेडसाठी शक्यतो खिडकीच्या जवळची जागा ठरवावी. या मापाप्रमाणे बेड घेतल्यास मुलं लवकर जागी होतात. त्यांना खिडकीतून येणाऱ्या शुद्ध आणि खेळत्या हवेचा लाभ होतो आणि सूर्योदयाचं सुंदर दृश्य बघायला मिळाल्याने त्यांच्या दिवसाची सुरुवात आनंदाने व सकारात्मकतेने होते.

करिअरवाटा

## विक्रीकौशल्य आहे?

प्रकाशनविश्वात नानाविध संधी उपलब्ध आहेत. त्यामुळे साहित्याची आवड आणि उत्तम जाण असणाऱ्यांनी कारकिर्दीच्या या पर्यायाचा गांभीर्याने विचार करायला हवा. संपादनकौशल्य असणाऱ्यांनाही इथे मनाजोगं काम करण्याचा आनंद मिळतो. संपादक सगळ्या विषयात तज्ज्ञ असतोच असं नाही. अशा वेळी ज्या त्या विषयातल्या तज्ज्ञाकडून मजकुराची तपासणी करुन घ्यावी लागते. पुस्तकातला मजकूर बिनचूक आहे की नाही, हे पहावं लागतं. त्यामुळे प्रकाशन व्यवसायात संधी शोधणाऱ्या व्यक्तीला एखाद्या विषयाचं विशेष ज्ञान असेल तर उपयुक्त ठरतं. पुस्तकांच्या विक्रीचंही वेगळं शास्त्र असतं. त्यामुळे विक्रीसाठी आवश्यक कौशल्य असणाऱ्यांनाही या व्यवसायात बऱ्याच संधी आहे. या व्यक्तीकडे ग्राहकांशी संपर्क साधण्याची हातोटी असावी लागते. प्रदर्शनांमधूनही पुस्तकांची विक्री केली जाते. अशा प्रदर्शनांचं आयोजन करणं, जाहिरात करणं आदी गोष्टी अवगत असाव्या लागतात. आता या व्यवसायाची उलाढाल वाढत आहे. त्यामुळे या क्षेत्रात काम करणाऱ्यांना चांगलं वेतन प्राप्त होत आहे. म्हणूनच पुस्तकांच्या गराड्यात वावरणं आवडत असणाऱ्यांसाठी हे क्षेत्र खुलं आहे.



खेचाखेची

## कोणतं गाणं?

**पत्नी:** ऐका ना... तुम्ही मला दुसऱ्यांदा प्रपोज करायचा विचार केला तर कुठल्या गाण्याने कराल?

.
.
.
.
.
.
.
.

**पती:** इतनी शक्ती मुझे देना दाता...

वेगळं काही

बिजिंगमधल्या झांग ली यांनी २६ मजली अपार्टमेंटवर माऊंटन व्हिलाज बांधण्याचा विक्रम केला. हा एक अजब–गजब प्रयोग म्हणायला हवा. इमारतीवरील टेकडी असं या इमारतीचं वर्णन खचितच योग्य आहे. हा टेकडीसदृष्य सांगाडा उभा करण्यासाठी कृत्रिम दगडांचा वापर करण्यात आला. मात्र, त्यावर उगवलेली झाडं आणि गवत अगदी खरं आहे. या संपूर्ण टेकडीच्या उभारणीसाठी सहा वर्षांचा कालावधी लागला. चीनमधील प्रसारमाध्यमांनी या प्रयोगाला प्रचंड प्रसिद्धी दिली. याविषयी बराच वादंगही उठला. अशा प्रकारे, इमारतीवर कृत्रिम टेकडी निर्माण करून त्यामध्ये माऊंटन व्हिलाज बांधण्याचा प्रयोग अनेकांनी अवैध ठरवला.

मेरा आशियाना

## नुकसान टाळण्यासाठी...

बरेचदा घरात छोट्या छोट्या अडचणी समोर येतात. वस्तूंचा पसारा आवाक्यापलीकडे वाढतो. घाईच्या वेळी एखादं काम खूप वेळ खातं. अशा वेळी शांत डोक्याने काम करणं चांगलं. त्यामुळे मानसिक शांतता राखली जाते शिवाय नुकसानही टळतं.

✻ टाकून न देता कल्पकतेचा वापर करून काही वस्तूंना नवा साज देता येतो. तुम्ही घरातील जुने मग भिंतींवरच्या खिळ्यांवर अडकवू शकता. त्यात किचनमधले नॅपकीन्स किंवा इतर छोट्या वस्तू ठेवता येतील. रिकाम्या बाटल्यांना सुतळी गुंडाळून त्यावर कृत्रिम फुलांचं डेकोरेशनदेखील करता येईल.



✻ कधी कधी चिनी मातीची किंवा धातूची भांडी एकमेकांमध्ये अडकल्यावर लवकर निघत नाहीत. अशा वेळी अडकलेल्या ठिकाणी ग्लिसरीन सोडावं. त्यानंतर थोडासा जोर लावून भांडं ओढावं. बोन चायनाची भांडी स्वच्छ करण्यासाठी लिक्विड सोपचाच वापर करावा. क्रोकरीवर लिंबू आणि ब्लीचचा उपयोग करणं टाळावं. त्यामुळे चरे पडू शकतात.

Printed and Published by: Swati Mahendra Kulkarni, Printed at "Samachar" 4188, Maidan Aad, Ahmednagar(M Corp), Dist.Ahmednagar, Pin Code - 414 001, Maharastra, Published at 4188, Maidan Aad, Ahmednagar(M Corp), Dist Ahmednagar, Pin Code- 414 001, Maharashtra. Editor- Swati Mahendra Kulkarni, Phone - (0241) 2345270, 2347086, Mob.- 9822470074.
हे मराठी सायंदैनिक, मुद्रक, प्रकाशक स्वाती महेंद्र कुलकर्णी यांनी ''समाचार'' ४१८८, मैदान आड, अहमदनगर (एम कॉर्प), जिल्हा–अहमदनगर, पिन कोड– ४१४ ००१, महाराष्ट्र येथे मुद्रित करून ४१८८, मैदान आड, अहमदनगर (एम कॉर्प) जिल्हा– अहमदनगर, पिन कोड– ४१४ ००१, महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक– स्वाती महेंद्र कुलकर्णी. दूरध्वनी– २३४५२७०, २३४७०८६, मो.– ९८२२४७००७४ E-mail - mahendra.samachar@gmail.com

समाचार

गुरुवार, दि. २५ जुलै २०२४ पान ३



भाजपा युवा मोर्चाची संघटनात्मक आढावा बैठक संपन्न

## युवा मोर्चाच्या पदाधिकाऱ्यांनी कामाला लागावे-चांदोडे

**समाचार/नगर-दि.२५**

भाजपा युवा मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष रोहित चांदोडे यांच्या उपस्थितीत भाजपा कार्यालयात युवा मोर्चाची संघटनात्मक आढावा बैठक संपन्न झाली, चांदोडे त्याचे स्वागत युवा मोर्चा अध्यक्ष मयूर बोचुघोळ यांनी केले यावेळी,रुद्रेश अंबाडे,अजित कोतकर,ओंकार लेंडकर,सुमित इप्पाळपेल्ली,करण कराळे, आकाश सोनावणे,सोमनाथ जाधव,यश शर्मा,श्रेयश नाराल,विशाल कर्डीले,अक्षय ढवले,अमोल थोरात,प्रज्योत लुनिया,आशिष ताकपीरे,साहिल टण्णू,किरण जगताप आदींसह पधादिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते

मयूर बोचुघोळ यांनी चांदोडे यांना संघटनात्मक कामाची माहिती दिली, युवकांना अगामी मनपा निवडणुकीत प्राधान्य मिळावे, अशी मागणी करून लोकसभा निवडणुकीतील युवा मोर्चाने कामाची माहिती दिलीरोहित चांदोडे म्हणाले, विधानसभा व मनपा निवडणुकीसाठी युवा मोर्चाच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी कामाला लागावे,लाडकी बहीण,बेरोजगारांना कर्ज,स्टार्टअप बिझनेस आदी राज्य व केंद्र सरकारच्या योजना घरोघरी पोहचवा,लोकसभा निवडणुकीत विरोधकांनी केलेला अप्रचार खोडून काढा,त्याला लगेच उत्तर द्या व सर्वानी यामध्ये सक्रिय व्हावे असेही ते म्हणाले.

# ॲड. आगरकर यांचा विरोधकांना सल्ला; अपप्रचारापेक्षा अर्थसंकल्प समजून घ्या

**समाचार/नगर-दि.२५**

केवळ राजकीय स्वार्थासाठी जनतेमध्ये संभ्रम निर्माण करून फेक नॅरेटिव्ह पसरविण्याच्या विरोधकांच्या कटाचा नवा चेहरा उघड झाला आहे. केंद्रीय अर्थसंकल्पात महाराष्ट्राला मिळालेल्या भरघोस निधीचा थांगपत्ताच न लागल्यामुळे विरोधकांनी सुरू केलेल्या शेरेबाजीस उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह पक्षाच्या ज्येष्ठ नेत्यांनी चोख उत्तर दिल्याने विरोधकांचे अर्थसंकल्पाविषयीचे अज्ञान उघडे पडले आहे, अशी टीका भाजपा नेते ड. अभय आगरकर यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे.



आपल्याला अर्थसंकल्पातले काही कळत नाही अशी जाहीर कबुली मुख्यमंत्रीपदावर असताना उद्धव ठाकरे यांनी दिली होती. त्यांचे हे अज्ञान आता उघड झाले असून, अर्थसंकल्प समजून घेण्यासाठी विरोधकांनी देवेंद्र फडणवीस यांनी लिहिलेले पुस्तकवाचावे असा खोचक सल्ला ॲड. आगरकर यांनी विरोधकांना दिला आहे. विरोधी पक्षांच्या नेत्यांनी मागणी केल्यास या पुस्तकाच्या प्रती त्यांना मोफत वितरित करण्यात येतील, असेही त्यांनी जाहीर केले. या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्यातच उद्धव ठाकरे यांनी आपल्या अज्ञानाची कबुली दिली होती, असे ते म्हणाले.

केंद्रीय अर्थसंकल्पात महाराष्ट्राला काहीच मिळाले नाही असा सूर काही विरोधी नेत्यांनी लावला असून काही माध्यमांनीही त्या सुरात सूर मिसळला आहे. अर्थसंकल्प कसा समजून घ्यावा याविषयीच्या अज्ञानातून किंवा राजकारणातून हे घडू शकते. त्यामुळे या नेत्यांनी फेक नॅरेटिव्ह पसरविण्याआधी अर्थसंकल्पाचे वाचन करावे किंवा जाणकारांकडून तो समजून घ्यावा असा सल्लाही ड. अभय आगरकर यांनी दिला आहे.

## जिल्हा ऑटो रिक्षा संघटना संयुक्त फेडरेशनच्यावतीने आ.जगताप यांचा सत्कार

**समाचार/नगर-दि.२५**

रिक्षा फिटनेस, पासिंग आदिं बाबींसाठी लेटफी ही दर दिवसाला ५० रुपये लावण्यात आली होती. या विरोधात नगरसह राज्यातील रिक्षा पंचायतीने आवाज उठविला. त्यासाठी निवेदने, विविध आंदोलन करावी लागली. जिल्हाध्यक्ष अविनाश घुले यांनी याबाबत आपणाकडे कायम पाठपुरावा केला. त्यानंतर आम्ही उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याशी चर्चा झाल्यानंतर त्यांनीही पुढाकार घेत याबाबत राज्याचे परिवहन



मंत्री यांच्याशी मुंबई येथे बैठक घेऊन ही अन्यायकारक दंडाची रक्कम रद्द करण्याबाबत सांगितले. मुख्यमंत्र्यांशी चर्चा करुन हा दंड राज्यात तात्पुरत्या स्वरुपात रद्द करण्यात आला आहे. परंतु ही बाब केंद्रीय परिवहन मंत्रालयाच्या आखतरित्या येत असल्याने राज्य सरकारच्यावतीने केंद्रीय परिवहन मंत्री ना. नितीनजी गडकरी यांच्याशी लवकरच चर्चा करुन हा दंड वसुली कायमस्वरुपी रद्द करण्यासाठी प्रयत्न करणार आहोत, असे प्रतिपादन आ.संग्राम जगताप यांनी केले.

जिल्हा ऑटो रिक्षा संघटना संयुक्त फेडरेशनच्यावतीने रिक्षा चालक-मालकांचा प्रश्न मार्गी लावल्याबद्दल आमदार संग्राम जगताप यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी फेडरेशनचे अध्यक्ष अविनाश घुले, जिल्हा रिक्षा पंचायतचे अध्यक्ष वैभव जगताप, दत्ता वामन, अशोक औशिकर, विलास कराळे, समीर कुरेशी, विजय शेलार, गुलाब दस्तगीर, बबन बारस्कर, अल्लाउद्दीन पठाण, विष्णू आंबेकर, अभय पतंगे, सुनिल रासकर, गोरख खांडवे, सचिन तनपुरे, शाहिद, जुनेद शेख, रिजवान शेख, गोविंद पोकळे, सलिम मुलानी, राहुल शिरसाठ, अशोक चौबे, निजामभाई, बाळासाहेब उबाळे, संजय कदम, हनुमंत दारकुंडे, प्रमोद बेदमुथा आदि उपस्थित होते.

## निधन वार्ता

### सुनील लुंकड



**समाचार/नगर-दि.२५**

नगर तालुक्यातील वाकोडी येथील व्यापारी सुनील घेवरचंद लुंकड (वाकोडीवाला), वय - ६०, यांचे बुधवार दि. २४ जुलै रोजी दुपारी तीनच्या सुमारास संथारा व्रतात निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुन, मुली - जावई, नातवंडे असा परिवार आहे. वाकोडी वि.का. सोसायटीचे संचालक प्रदीप लुंकड यांचे ते कनिष्ठ बंधू होते.

### अशोक येनगुल



**समाचार/नगर-दि.२५**

सेवानिवृत्त लेखापरिक्षक अशोक येनगुल यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी तीन मुले, एक मुलगी, सूना, नातवंडे असा मोठा परिवार असून ते प. पु. माताजी श्री निर्मला देवी यांचे असीम भक्त होते, ते सहज योग कार्यात हिरारीने सहभागी होत त्यांच्या निधनाने अहमदनगर सहजयोग परिवाराचे एक मार्गदर्शक हरपलेचे खंत सहजयोगी व्यक्त करतात.

### सोहन कोतकर



**समाचार/नगर-दि.२५**

केडगाव येथील श्री एन्टरप्रायजेसचे संचालक सोहन भीमराज कोतकर यांचे दीर्घ आजाराने काल (दि. २४) रात्री निधन झाले. ते २५ वर्षांचे होते. त्यांच्या मागे आई, आजी, भाऊ असा परिवार आहे. अनेक वर्षांपासून ते स्लायडिंग विंडोचा व्यवसाय करत होता. इतरांना कायम मदत करण्याचा त्यांचा स्वभाव होते. त्यांचा अंत्यविधी केडगाव येथील अमरधाममध्ये करण्यात आला.

मुख्याध्यापक, शिक्षक समन्वय समितीचा इशारा

## शैक्षणिक प्रश्नांची सोडवणूक न केल्यास आंदोलन

**समाचार/नगर-दि.२५**

राज्य शासनाने शिक्षण क्षेत्रातील प्रश्न त्वरित सोडवावेत अन्यथा ६ ऑगस्ट रोजी राज्यभरातील जिल्हाधिकारी कार्यालयावर धरणे आंदोलने व मोर्चे काढण्यात येतील, या बाबतचे निवेदन राज्याचे शिक्षणमंत्री ना. दीपक केसरकर यांना मुख्याध्यापक संघ महामंडळाचे राज्य उपाध्यक्ष तथा अहमदनगर जिल्हा मुख्याध्यापक संघाचे जिल्हाध्यक्ष प्राचार्य सुनील पंडित यांनी दिले. याप्रसंगी शिर्डी लोकसभा मतदारसंघाचे माजी खा.सदाशिव लोखंडे, महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे कोषाध्यक्ष प्रसाद सामलेटी व संस्थाचालक संघाचे उमेश रेखे आदीउपस्थित होते.



दीपक केसरकर यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, संचमान्यते संदर्भातील नवीन १५ मार्च २०२४ चा आदेश रद्द करून, जुन्या आदेशानुसार संचमान्यता करण्यात यावी. शिक्षक-शिक्षकेतर कर्मचार्यांसाठी जुनी पेन्शन योजना जाहीर करावी. पवित्र पोर्टल मधील शिक्षक नियुक्ती लवकरात लवकर करावी ,अथवा संस्थेला शिक्षक नियुक्तीसाठी परवानगी द्यावी. शिक्षकेतर कर्मचार्यांच्या मान्यता मिळाव्यात, असेच इतर मागण्या निवेदनात करण्यात आल्या आहेत.

## प्राचार्य उजगरे यांचे निधन

**समाचार/नगर-दि.२५**



अहमदनगर महाविद्यालयाचे माजी प्राचार्य मा. श्री ड़ी.एम.उजगरे अर्थात दौलतरा माधवराव उजगरे यांचे वयाच्या ८७ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. ते अहमदनगर महाविद्यालयामध्ये पदार्थ विज्ञान विषयाचे अध्यापन करीत होते. १९९७ मध्ये प्राचार्य म्हणून सेवानिवृत्त झाले. त्यांनी अनेक विद्यार्थी घडविले. त्यांचे विद्यार्थी देशामध्ये व विदेशामध्ये उच्च पदावर कार्यरत आहेत. त्यांच्या मागे पत्नी, एक मुलगा, सून, नातवंडे, नाती व एक नातू, तसेच मुलगी व जावई असा परिवार आहे.

दि. २५ जुलै रोजी दुपारी तीन वाजता ह्यूम मेमोरियल चर्च येथे अंतिम उपासना व त्यानंतर सिद्धार्थनगर येथील मंडळीच्या दफनभूमीमध्ये त्यापुढील विधी होईल.

लेखापरीक्षक अहवाल मुदतीत सादर करण्याचे आदेश

# मार्कंडेय पतसंस्थेची चौकशी सुरु

**समाचार/नगर-दि.२५**

श्री मार्कंडेय नागरी सहकारी पतसंस्थेची उपनिबंधक कार्यालयाकडून चौकशी सुरू झाली आहे.

येथील मार्कडेंय नागरी सहकारी पतसंस्था मर्या. संस्थेने वार्षिक ताळेबंद पत्रकामध्ये सन २०२२-२३ या आर्थिक वर्षामध्ये संस्थेच्या थकीत कर्ज व्याज देण्याची तरतुद ही रक्कम रु.४,६१,९६, ३५५/- एवढी केलेली आहे. यापुर्वीच्या वार्षिक अहवालामध्ये कोठेही अशा प्रकारची व्याज देण्याची तरतुदी केलेली नव्हती व नाही. या अनुषंगान असे निदर्शनास येते की, कर्जदार यांनी मागील तीन ते चार वर्षामध्ये थकीत कर्जाची व्याज भरलेली नाही अथवा संस्थेचे कर्ज मोठया प्रमाणात थकीत होवून संस्थेचा एन पी ए वाढलेला असल्या कारणामुळे संस्थेला आजपावेतो मिळालेल्या संपुर्ण नफ्याची तरतुद ही थकीत कर्जव्याज देणे म्हणुन करावी लागलेली आहे. त्या अनुषंगाने संस्थेमध्ये कर्ज प्रकरण मोठया प्रमाणे थकीत असून संस्थेचे संचालक हे थकबाकीदार व कर्जदाराकडून कर्ज रक्कम वसुल करणेकामी पुर्णपणे निष्फळ ठरले आहेत. अशीच संस्थेची परिस्थिती राहिल्यास सदरची संस्था ही लवकरच अवसानात निघेल. सदरची संस्था ही शहरातील गरीब, मोलमजुरी करणारे विडी कामगार लोकांची संस्था असून सदर संस्थेस अवसानापासून वाचविण्याकरीता व संचाक मंडळाचे अनागोंदी कारभारास लगाम लावण्याकरीता सदर संस्थेची महाराष्ट्र सहकारी कायदा १९६० चे कलम ८३ प्रमाणे चौकशी होणे आवश्यक वाटते.

सदर संस्थेस अवसानात निघण्यापासून वाचविण्याकरीता आपल्या कार्यालया मार्फत योग्य ते चौकशीचे आदेश व्हावे असे तक्रार अर्ज संस्थेचे सभासद पुरूषोत्तम मल्लाय्या सब्बन यांनी दि. १९ जून २०२४ रोजी तालुका उपनिबंधक सहकारी संस्था यांना दिलेले होते.

सदर तक्रार अर्जानुसार तालुका उपनिबंधक यांनी सदर मार्कडेंय नागरी सहकारी पतसंस्थेचे सन २०२३-२४ चे लेखा परिक्षण करण्यासाठी लेखा परीक्षक यांची नेमणुक केली आहे. तसेच महाराष्ट्र सहकार कायदा अधिनियम १९६० मधील तरतुद, महाराष्ट्र राज्य बिगरकृषी सहकारी पतसंस्था नियामक मंडळ तसेच शासन वरिष्ठ कार्यालयाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णय व परिपत्रकास आधीन राहुन तक्रार अर्जाच्या अनुषंगाने कारवाई करुन त्याबाबत नोंदी लेखापरिक्षण अहवालात करण्यात येवुन लेखापरिक्षण अहवाल विहित मुदतीत तालुका उपनिबंधक सहकारी संस्थेस सादर करण्याबाबत आदेशीत केले आहे. त्यानुसार सदर मार्कडेंय नागरी सहकारी पतसंस्थेची चौकशी चालु आहे, असे पुरुषोत्तम सब्बन यांनी सांगितले.

## पान १ वरुन

### अपघात होतात; उपाय कधी?

उड्डाणपुलामुळे शहरातील वाहतूक कोंडीचा प्रश्न मोठ्या अंशी मिटला परंतु उड्डाणपुलावर वारंवार होणाऱ्या अपघातामुळे उड्डाणपूल नेहमीच चर्चेत राहिला. उड्डाण पुलावरील स्टेट बँकेजवळ असणारे वळण धोकादायक झाल्याने तेथे वारंवार अपघात होत आहेत. त्या दृष्टीने विचार केल्यास उपलब्ध जागेनुसार आणि जीपीओ चौक व चांदणी चौक पार करण्यासाठी पूल आवश्यक असल्याने तेथे तीव्र वळणाशिवाय पर्याय नव्हता. वळण धोकादायक आहे हे मान्य केले तरी तेथे अपघात होणे हे इतर मार्गांनी टाळता येणे शक्य आहे. त्यासाठी काही नियमांचे व सूचनांचे पालन करणे गरजेचे आहे. त्या वळणावरील अपघात टाळण्यासाठी वेगावर नियंत्रण ठेवणे अत्यंत गरजेचे आहे. त्यासाठी वेग मर्यादा ठरवून दिलेली असली तरी त्याबद्दल सूचनांचे फलक तेथे दिसत नाहीत. अशोका हॉटेलच्या बाजूने पुलाची सुरुवात होते तेथूनच त्यासंबंधी सूचनांचे फलक लावणे अत्यंत गरजेचे असताना देखील ते लावण्यात आले नाही. त्याचबरोबर गतिरोधकांचा वापर सतत ब्लिंक करणारे पिवळे दिवे यांचा वापर देखील तेवढाच गरजेचा आहे. परंतु तो करण्यात आलेला नाही. कालच्या घटनेमध्ये टेम्पो चालकाचे वेगावर नियंत्रण नसणे हा मुख्य मुद्दा, त्याचबरोबर शहराच्या चारही बाजूने बाह्यवळण रस्ता झालेला असताना देखील अवजड वाहने शहरात कशी येतात हा दुसरा महत्त्वाचा मुद्दा. नियमाप्रमाणे सकाळ ते रात्रीपर्यंत अवजड वाहतुकीला शहरातून प्रतिबंध करण्यात आलेला आहे हे विशेष. यावर वाहतूक नियंत्रण शाखेचे कुठेही कडक नियंत्रण दिसत नाही. प्रत्येक वेळेस पुलाच्या कामाला दोष देऊन काहीही साध्य होणार नाही तर त्यासाठी नियमांचे पालन करणे सर्वात महत्त्वाचे आहे.

### जिल्ह्यातील धरणांमधून मोठा विसर्ग

धरणातून प्रवरा नदीत ८,३५ क्युसेक तर भिमा नदी - दौंड पूलवरून ५१,१६६ क्युसेक वेगाने पाण्याचा विसर्ग सुरू झाला आहे. त्यामुळे नगर जिल्ह्यातील उत्तर भागात कोपरगाव राहता श्रीरामपूर नेवासा या तालुक्यातील गोदावरी नदी काठावरील नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. त्याचबरोबर श्रीगोंदा व कर्जत तालुक्यातील भीमा नदी काठावरील नागरिकांना अति सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्र कुमार पाटील यांनी प्रसिद्ध दिलेल्या पत्रकात नागरिकांनी प्रशासनाद्वारे दिलेल्या सूचनांचे पालन करून सुरक्षित स्थळी स्थलांतर करावयाचे आवाहन करण्यात आले आहे.

### अनेक मोठ्या कंपन्या भारतात

सुरू करण्याची शक्यता तपासली होती. उत्तर प्रदेशमध्ये कोट्यवधी अकुशल कामगार आहेत. जर्मन रिटेलर 'टेकपॉइंट'चे कार्यकारी संचालक उली सेरस म्हणाले की पुरवठ्यासाठी केवळ चीनवर अवलंबून राहणे योग्य नाही. भारताकडे वळावे लागेल. डोनाल्ड ट्रम्प यांनी आपल्या अध्यक्षीय काळात चीनच्या निर्यातीवरील दर वाढवला होता. नंतरचे अध्यक्ष ज्यो बायडेन यांनी त्यात वाढ केली. आता कोणीही अध्यक्ष झाले, तरी ही स्थिती कायम असेल.

## 'मतदारांची गैरसोय न होता मतदान केंद्राचे सुसूत्रीकरण करावे'

**समाचार/नगर-दि.२५**

मतदान केंद्राचे सुसूत्रीकरण मतदारांची गैरसोय होऊ नाही अशी करावीख अशी मागणी मनसे शहर उपाध्यक्ष संकेत व्यवहारे यांनी केली.

विधानसभा २२५ निवडणूक लवकरच होणार असून या संदर्भात प्रशासनाने काही मतदान केंद्रावरील केंद्र बदलण्यात आले आहेत त्यामध्ये मतदान केंद्र क्रमांक ३९-सावेडी दामोधर शंकर रेणाविकर विद्या मंदिर, पूर्वेकडील उत्तर दक्षिण इमारत, उत्तरेकडून खोली क्र. ०५ पूर्वी हे होते ते मतदान केंद्र

ज्ञानसंपदा स्कूल, तपोवन रोड सावेडी, मुख्य इमारत दक्षिणेकडील पश्चिमेकडून खोली क्र.०२ या ठिकाणी स्थलांतरित केले आहे तसेच मतदान केंद्र सावेडी ३९ व मतदान केंद्र सावेडी ४२ हे वरील जागेवर स्थलांतरित केले आहे रेणाविकर विद्या मंदिर पासून ज्ञानसंपदा स्कूल, तपोवन रोड हे अंतर १५०० मीटर लांब आहे त्यामुळे मतदारांना येण्या जाण्यासाठी मोठी गैरसोय होऊ शकते तेथे कोणतेही येणे जाण्यासाठी साधन उपलब्ध नसते . मतदान केंद्र लांब असल्यामुळे मतदारांनी गैरसोयीमुळे मतदान जर केले नाही तर त्यामुळे मतदान प्रक्रियेच्या टक्केवारी वर परिणाम होऊ शकतो.रेणाविकर विद्या मंदिर पासून ऑक्झिलियम कॉन्व्हेंट स्कूल अवघ्या ५०० मीटर अंतरावर आहे शाळा जवळ असल्यामुळे कोणत्याही मतदारांची गैरसोय होणार नाही त्यामुळे ज्ञानसंपदा स्कूल, तपोवन रोड येथे जे केंद्र मतदान केंद्र स्थलांतर करण्यात येणार आहे ते ऑक्झिलियम कॉन्व्हेंट स्कूल येथे स्थलांतरित करण्यात यावे.यावेळी गजेंद्र राशीनकर शहराध्यक्ष डॉ. संतोष साळवे, शहर सचिव संकेत व्यवहारे, शहर उपाध्यक्ष किरण रोकडे, शहर उपाध्यक्ष तुषार हिरवे, शहर उपाध्यक्ष महेश चव्हाण, विभाग अध्यक्ष प्रवीण गायकवाड, विभाग अध्यक्ष गणेश शिंदे, सहकार सेना शहराध्यक्ष व आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

समाचार

**वाचकांना नम्र सूचना**

**समाचार** वृत्तपत्रातून प्रसिध्द होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करुनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची **समाचार** वृत्तपत्र कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्यांच्या परिणामाबद्दल **समाचार** वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाहीत. याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

## मुंबई शेअर भाव

**अमेरिकन मंदी**

**नॅसडॅक ६५० अंकाने घटला तर सेन्सेक्स केवळ १०० ने**

(शेअर सबब्रोकर)
अशोक पटवा
फोन-२४५२५२७, २४५२२६४
मोबा. ८७८८६९९९६१

**दिनांक २५-७-२०२४ दुपारी २ पर्यंतचे भाव**

| | |
|---|---|
| आजचा इंडेक्स : | ८००४२ |
| एसीसी | २५७४-७५ |
| एशियन पेंट | २९०१-०२ |
| बजाज ऑटो लि. | ९२८६-८७ |
| बलराम फूड चिनी | ४४५-४६ |
| भारत फोर्ज | १५८४-८५ |
| क्रॉम्प्टन | ४४७-४८ |
| डीएलएफ | ८०७-०८ |
| डॉ. रेड्डीज् लॅब | ६८४७-४८ |
| ग्रॅफाईट इंडिया | ५२७-२८ |
| हिंदुस्थान युनिलिव्हर | २७०२-०३ |
| आयटीसी लि. | ४८९-९० |
| एल ॲण्ड टी लि. | ३६२७-२८ |
| रिलायन्स इंड. | २९८१-८२ |
| एसबीआय | ८४६-४७ |
| टाटा मोटर्स | १०८९-९० |
| टाटा स्टील | १५७-५८ |
| टीसीएस | ४३२४-२५ |

# कौशल्य विकासावर भर देणारा अर्थसंकल्प

भारत हा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठी लोकसंख्या असलेला देश आहे. भारताला युवा लोकसंख्येमुळं एक महत्त्वपूर्ण स्थान जगामध्ये प्राप्त झाले आहे. भारतातील ६५ टक्के पेक्षा जास्त लोकसंख्या ही ३५ वर्षाखालील आहे. आणि सुमारे ५०% लोकसंख्या ही २५ वर्षाखालील आहे. ही वाढती युवा लोकसंख्या जी लोकसंख्यात्मक लाभांश म्हणून ओळखले जाते ती देशाच्या आर्थिक आणि सामाजिक प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वाची आहे. भारतीय युवा लोकसंख्या ही एक प्रचंड आव्हान आणि एक अतुलनीय संधी आहे. ३५ वर्षाखालील ६५% पेक्षा जास्त लोकसंख्येसह भारत अशा निर्णायक वळणावर आहे जिथे शिक्षण आणि कौशल्य विकासामध्ये केलेली गुंतवणूक सामाजिक आणि आर्थिक परिवर्तनाला चालना देऊ शकते. २०२४-२०२५ साठीचा केंद्रीय अर्थसंकल्प या अंतरांना दूर करण्यासाठी आणि भारताला भविष्यातील कार्यक्षमतेसाठी तयार करण्याच्या उद्देशाने एक धोरणात्मक आराखडा मानतो असे वाटते. २०२४-२०२५ च्या केंद्रीय अर्थसंकल्पाने शिक्षण आणि कौशल्य विकास क्षेत्राला मजबूत करण्यासाठी महत्त्वपूर्ण निधी उपलब्ध करून दिला आहे त्यातील मुख्य मुद्दे खालीलप्रमाणे आहे.

**शिक्षण क्षेत्र–** यामध्ये १.१२ लाख कोटींची तरतूद केलेली आहे जी मागील वर्षाच्या तुलनेत १२% पेक्षा जास्त वाढलेली आहे यामध्ये पायाभूत सुधारणा, शिक्षण प्रशिक्षण कार्यक्रम आणि डिजीटल शिक्षण अशा उपक्रमांवर भर दिलेला दिसतो. उच्चशिक्षणासाठी ५६,००० कोटींची तरतूद केली गेलेली आहे ज्यात संशोधन आणि विकास नवीन आयआयटी आणि आय आय एम स्थापन करण्यावर भर दिला गेला आहे आणि आर्थिक दृष्ट्या समाजातील दुर्बल वर्गातील गुणवंत विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्तीवर भर देण्यात आलेला आहे.

**कौशल्य विकास–** कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालय म्हणजेच एम एस डी इ यांच्यासाठी २५,००० कोटींची तरतूद करण्यात आलेली आहे. जी मागील वर्षाच्या तुलनेत १५% वाढ दर्शविते यामध्ये निधी कौशल्य प्रशिक्षण केंद्र स्थापन करणे तसेच व्यावसायिक प्रशिक्षण कार्यक्रम आणि औद्योगिक भागीदारी यांच्या विस्ताराला चालना देण्याच्या दृष्टिकोनातून प्रयत्न करण्यात येणार आहेत. तसेच प्रधानमंत्री कौशल्य विकास योजनेसाठी ८,००० कोटींची तरतूद करण्यात आलेली आहे ज्यामध्ये ए आय, रोबोटिक्स आणि ब्लॉकचेनसारख्या आजच्या नव कौशल्यांवर भर देण्यात आलेला आहे.

प्रमुख उपक्रम आणि धोरणात्मक उपाय यामध्ये शिक्षण आणि कौशल्य यातील अंतर दूर करण्यासाठी व शिक्षणाच्या गुणवत्तेला चालना देण्यासाठी अनेक उपक्रमांची घोषणा करण्यात आलेली आहे यामध्ये डिजीटल शिक्षण आणि शिक्षण यामध्ये डिजीटल इंडिया ई लर्निंग प्लॅटफॉर्म याचा विस्तार क्षेत्रीय भाषांमध्ये करण्यात येणारा आहे ज्यामुळे शिक्षणामध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षणावर भर निर्माण होऊन शिक्षणाची सर्वसमावेशकता वाढू शकते यासाठी भारतातील अग्रगण्य अशा अनेक कंपन्यांचे सहकार्य घेण्यात येणार आहे त्याद्वारे अत्याधुनिक अशा ऑनलाईन अभ्यासक्रम निर्माण करण्यात येतील ज्याचा सर्वसामान्य घटकातील विद्यार्थ्यांना उपयोग होऊ शकतो.

कौशल्य हब आणि उत्कृष्टतेची केंद्रे यांच्या निर्मितीवर भर देण्यात आलेला आहे यामध्ये उदयन्मुख क्षेत्रांमध्ये प्रत्यक्ष प्रशिक्षण देण्यासाठी जवळजवळ ५०० नवीन हबची स्थापना करण्यात येणार आहे त्याचबरोबर प्रत्येक राज्यामध्ये संशोधन, इनोवेशन आणि उद्योजकता वाढविण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहे. सार्वजनिक व खाजगी भागीदारी यामध्ये अभ्यासक्रमांची रचना, प्रशिक्षण वितरण आणि नोकरीच्या ठिकाणी खाजगी क्षेत्रातील तज्ञतेचा लाभ घेण्यासाठी सार्वजनिक व खाजगी मॉडेल तयार करण्यात येणार आहे. औद्योगिक प्रशिक्षण संस्था आणि तंत्रनिकेतन महाविद्यालय दत्तक घेण्यासाठी कार्पोरेट कंपन्यांना प्रोत्साहन देण्यात येणार आहे त्यामुळे विद्यार्थ्यांना उद्योग संबंधित प्रशिक्षण हे प्राप्त होऊ शकते. ग्रामीण आणि दुर्गम भागातील तरुणांना कौशल्य प्रशिक्षण देण्यासाठी विशेष योजनांवर भर देण्यात आला आहे. यामध्ये मोबाईल प्रशिक्षणावर भर देण्यात आला आहे. त्याचबरोबर दुर्गम क्षेत्रामध्ये प्रशिक्षण निर्मिती केंद्र तयार करण्यात येणार आहेत. अविकसित प्रदेशातील शाळांसाठी पायाभूत सुविधा सुधारण्यासाठी आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा प्रवेश सुधारण्यासाठी आर्थिक निधीची तरतूद करण्यात आलेली आहेत.

२०२४- २०२५ च्या अर्थसंकल्पात मांडलेल्या सर्व समावेशक दृष्टिकोनामुळे व त्यांची प्रभावी अंमलबजावणी केल्यास खालील प्रमाणे लाभ होऊ शकतात.

**रोजगार क्षमतेत वाढ–** उद्योग संबंधित कौशल्यांवर अधिक लक्ष केंद्रित केल्याने भारतातील तरुणांची रोजगार क्षमता सुधारू शकते ज्यामुळे बेरोजगारीचा दर कमी होईल आणि अपेक्षित कौशल्यपूर्ण मनुष्यबळ प्राप्त होऊ शकेल.

**आर्थिक वाढ–** कुशल मनुष्यबळ उत्पादकता आणि नवकल्पनांना चालना मिळू शकेल ज्यामुळे भारताच्या आर्थिक वाढीस व जागतिक स्तरावरील स्पर्धांना आपण तोंड देऊ शकू.

**सामाजिक समानता–** समाजातील वंचित आणि दुर्लक्ष झालेल्या भागातील राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमांमुळे सामाजिक समानतेला प्रोत्साहन मिळेल व समाजाच्या सर्व घटकांना देशाच्या विकासाचा लाभ होईल.

**नवकल्पना आणि उद्योजकता–** संशोधन आणि विकासात वाढीव गुंतवणूक केल्यामुळे विद्यार्थ्यांना उद्योजकता प्रशिक्षणासह नवकल्पना आणि स्टार्टअप वाढीची संस्कृती विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होऊ शकेल. २०२४-२०२५ चा अर्थसंकल्प भारताच्या शिक्षण आणि विकासाच्या दृष्टीने तयार करण्यात आलेला हा एक आराखडा नव्या भारताच्या दिशेने उचललेले एक निर्णायक पाऊल आहे असे आपण म्हणू शकतो जर उपरोक्त तरतुदींची व्यवस्थित अंमलबजावणी केल्यास डिजिटल शिक्षण, सार्वजनिक खासगी भागीदारी आणि सर्वसमावेशक विकासाला प्राधान्य देऊ शकेल असे वाटते यामुळे भारतीय विद्यार्थ्यांना एक समृद्ध आणि न्याय भविष्याचा मार्ग मिळेल अशी अपेक्षा करूयात.

**– प्रा. डॉ. स्वाती मुनोत**

# अर्थमंत्र्यांचा रेल्वेसाठी ऐतिहासिक अर्थ संकल्प- डुंगरवाल

**समाचार/नगर-दि.२५**

अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी संपूर्ण देशाचा अर्थसंकल्प सादर केला. यामध्ये रेल्वे विभागासाठी भरपुर निधीची तरतूद केली आहे. अर्थमंत्र्यांनी रेल्वेला विक्रमी २,६२,२०० कोटी रुपये दिले. यामधून सुरक्षा आणि पायाभूत सुविधा मजबूत करण्यावर भर देण्यात येईल. त्या माध्यमातून रेल्वेचे आधुनिकीकरणाबरोबरच जाळे देशभर मोठ्या प्रमाणात विस्तारण्यास मदत होऊन नागरिकांची मोठी सोय होणार त्यामुळे रेल्वेसाठी हा ऐतिहासिक अर्थसंकल्प असल्याची प्रतिक्रिया मुंबई मध्य रेल्वेचे सल्लागार समितीचे सदस्य सुदर्शन डुंगरवाल यांनी दिली.

अधिक माहिती देतांना डुंगरवाल म्हणाले, अंतरिम रेल्वे अर्थसंकल्प २०२४ मध्ये रेल्वे सुरक्षा उपाय वाढविण्याचा उपक्रम, आगामी रेल्वे अर्थसंकल्पात रेल्वे अपघात कमी करण्यासाठी विविध उपाययोजना राबवून सुरक्षेच्या प्रश्नांवर लक्ष केंद्रित केले जाणार आहे. प्रगत सिग्नलिंग सिस्टीममध्ये गुंतवणूक, ट्रॅकची देखभाल आणि रेल्वे कर्मचार्यांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम अजेंड्यावर आहेत. संपूर्ण रेल्वे नेटवर्कमध्ये सुरक्षा प्रोटोकॉल सुधारणे हे प्राथमिक उद्दिष्ट आहे, ज्यामुळे प्रवाशांना सुरक्षित आणि विश्वासार्ह प्रवास अनुभवाची हमी मिळेल. सुरक्षितता वाढवण्यावर लक्ष केंद्रित करून, रेल्वे अर्थसंकल्पात प्रवाशांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणे आणि रेल्वे प्रवासादरम्यान त्यांच्या आरोग्याला प्राधान्य देणे हे आहे.

अर्थमंत्री सीतारामन यांनी भारतीय रेल्वेच्या ४०,००० बोगींचे वंदे भारत मानक डब्यांमध्ये रूपांतर करण्यावर भर दिला. याशिवाय, मेट्रो रेल्वे आणि नमो भारत नेटवर्कचा मोठ्या शहरी केंद्रांपर्यंत विस्तार करण्याची योजना आखण्यात आली. त्यामुळे या अर्थसंकल्पातून रेल्वे प्रवासी, कर्मचारी आणि देशाचा मानबिंदू उंचविणारा असल्याचे डुंगरवाल यांनी सांगितले.

## जानकी कवडे प्रशालेत टिळक जयंती विविध उपक्रमाने साजरी

**समाचार/जामखेड-दि.२५**

स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मिळवणारच, अशी भीमगर्जना करणारे थोर पत्रकार, स्वातंत्र्यसेनानी, निर्भिड वक्ता लोकमान्य टिळक यांची जयंती मोठ्या उत्साहात स्वातंत्र्य सैनिक जानकी कवडे प्रशालेत साजरी करण्यात आली. स्वामी विवेकानंद जनकल्याणचे संचालक रविंद्र जाजू यांनी लोकमान्य टिळकांविषयी माहिती दिली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रविंद्र जाजू होते. यावेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ. रवींद्र कवडे, संचालिका राज कवडे यांची उपस्थिती होती.

रमेश वराडे, सुनील तरवडे, रितेश फिरोदिया, रविंद्र जाजू, शिवप्रसाद काळे, श्रीपाद मुंबी, गोरक्षनाथ वामन आदी स्वामी विवेकानंद जनकल्याण प्रबोधिनी ट्रस्टच्या टिमने प्रशालेतील विद्यार्थ्यांना मोफत शालेय गणवेशाचे वाटप केले. जयंतीचे औचित्य साधत प्रशालेत वृक्षलागवड करण्यात आली

प्रज्ञाशोध परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा पाहुण्यांचा हस्ते गौरव करण्यात आला. प्रथमेश सत्रे याने लोकमान्य टिळकांची व्यक्तिरेखा साकारली. स्वयंप्रभा खंडागळे यांनी सूत्रसंचालन केले. आभार सुनंदा जावळे यांनी मानले.

कार्यक्रमास प्रशालेचे मुख्याध्यापक नंदकुमार लोणकर, उज्ज्वला घावटे, दिपक पंडित, सिराज खान, गणेश कवटे, मुनिबा काझी, सायमा सय्यद आदी उपस्थित होते.

## डॉ.ॲड.अरुण जाधव यांना कै. देशमुख पुरस्कार

**समाचार/जामखेड-दि.२५**

जामखेड गावातील प्रतिकूल परिस्थितीवर मात करून ज्याने स्वतःचे करिअर उत्तम केलेलं आहे आणि आज प्रामाणिकपणे निष्ठेने काम करीत आहे अशा व्यक्तीचा गुणगौरव कै. तात्यासाहेब देशमुख पुरस्काराने दिला जातो. यावर्षी चा पुरस्कार जामखेड मधील तरुण युवा व्यक्तिमत्व डॉ. ॲड.अरुण जाधव यांना जाहीर झाला आहे. २७ जुलै रोजी कै. तात्यासाहेब देशमुख यांचा स्मृतिदिन असून प्रसिद्ध कवी व गझलकार हिमांशू कुलकर्णी यांच्या हस्ते देण्यात येणार आहे अशी माहिती संयोजक डॉ. अ. ल. देशमुख यांनी दिली.



यावर्षीचा हा पुरस्कार प्रसिद्ध कवी आणि गझलकार हिमांशू कुलकर्णी यांच्या हस्ते पुणे येथे २७ जुलै रोजी दिला जाणार आहे. या कार्यक्रमासाठी पीपल्स एज्युकेशन सोसायटीचे अरुण चिंतामणी शशी देशमुख, राजाभाऊ मोरे तसेच ड अरुण जाधव यांचे काही सहा अध्यायी, सहयोगी उपस्थित राहणार आहेत जामखेडचे पुणे येथील रहिवासी या कार्यक्रमाला दरवर्षी आवर्जून येतात अशी माहिती डॉ. अ. ल. देशमुख, पुणे यांनी दिली आहे.

# आदिवासी समाजाच्या उन्नतीसाठी कार्यरत ‘केशवसृष्टी’

लोकसेवार्थ

खरं तर आपला दऱ्याखोऱ्यात, रानावनात वर्षानुवर्षे जीवन जगणारा आपला आदिवासी बांधव हा इथला मूळ निवासी आहे. याच आदिवासी समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आणि त्यांची प्रगती, उन्नती साधण्यासाठी शासन करोडो रुपये खर्चून आदिवासी बांधवांसाठी अनेक योजना राबविते परंतु या दुर्गम भागातील आदिवासींचा हवा तास विकास अद्याप झालेला नाही. याच पार्श्वभूमीवर केशवसृष्टीसारखी संस्था या आदिवासी बांधवांच्या उन्नतीसाठी झटते आहे. या संस्थेने २०१९ पासून टेंटवाली गावातील २५ आदिवासी महिलांना बांबूपासून आकर्षक वस्तू बनविण्याचे प्रशिक्षण दिले. विक्रमगड तालुक्यातील १५ गावांमध्ये सध्या बांबूच्या सुमारे



१५० वस्तू दिवसाला बनवल्या जात असून सध्या येथील कामगार राख्या बनविण्यात देखील मग्न आहेत. विक्रमगड आणि वाडा तालुक्याची ओळख आदिवासी बहुल आणि कुपोषणग्रस्त अशीच आहे हेच हेरून केशवसृष्टी संस्थेने येथील महिलांना काम मिळवून दिले आहे. या आदिवासी पाड्यातील अनेक महिलांना बांबू वापरून त्यापासून वस्तू बनविण्याचा व्यवसाय मिळाला असून वणीपाडा, गदरवाडी, चिंचपाडा, वाकी, खुदेड, माडाचा पाडा इ. १५ गावांमध्ये आता ५०० हून अधिक कलाकार तयार झालेले आहेत. बांबूपासून राख्या बनविण्याचे तंत्र या कलाकारांनी आत्मसात केले असून सध्या हे कलाकार २० हजार राख्या बनविण्यात व्यस्त आहेत. मागील दोन वर्ष मिळालेल्या भरघोस यशानंतर आता ग्राहकांना काहीतरी वेगळे आणि बाजारात उपलब्ध राख्यांच्या तोडीस तोड डिझाईन बनविण्यासाठी या कलाकारांनी लेझर मशीनच्या साहाय्याने सुबक नक्षीकाम करायला सुरवात केली असून पारंपरिक आणि नैसर्गिक राख्यांना दिलेला आधुनिक मुलामा अधिक मोहक वाटतो. केशव कुटीर ॲग्रो प्रॉडक्ट प्रा. लिमिटेड नावाने या राख्याना बाजारात जागा उपलब्ध करून दिली जात असून लाखो रुपयांचा नफा आता हे आदिवासी बांधव मिळवत आहेत हे विशेष. हा व्यवसाय आता जगभर पोहचत असून ट्रे, मोबाईल स्टॅण्ड, पेन स्टॅण्ड, आकाश कंदील अशा जवळपास बांबूच्या १२५ वस्तू हे कलाकार बनवितात. आदिवासी कलाकारांना मिळालेले हे हक्काचे व्यासपीठ अधिक व्यापक करण्याचा केशवसृष्टी संस्थेचा मानस असून केवळ शासकीय योजनांवर अवलंबून न राहता स्वतःची ओळख निर्माण करून देणारा आत्मसन्मान या व्यवस्यामुळे येथील कलाकारांना मिळाला आहे. अर्थात केशवसृष्टी सारख्या संस्थेच्या प्रयत्नातून या आदिवासी बांधवाना मिळालेला हा हक्काचा रोजगार त्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी नक्कीच महत्वाचा ठरणार आहे.

## A.M. शब्दार्थ

A.M. चे पूर्ण रूप Ante-Meridiem आहे. एएम हा लॅटिन शब्द आहे, जो दुपारच्या आधी १२-तास घड्याळ प्रणाली दर्शवण्यासाठी वापरला जातो. A.M. म्हणून देखील चित्रित अँटी मेरिडियम म्हणजे दुपारच्या आधी. हे वेळेच्या मानकांचे एकक आहे आणि १२-तासांच्या घड्याळाशी संबंधित आहे. १२-तास प्रणाली दिवसाच्या वेळेचे चक्र दोन भागांमध्ये विभाजित करते. A.M. किंवा Ante Meridiem हा पहिला कालावधी दर्शवतो. A.M. किंवा ते पूर्ण फॉर्म आहे Ante Meridiem मध्यरात्री ते दुपारच्या वेळेचे वर्णन करते.

## शब्दखेळ - २०८

खाली दिलेल्या चौकोनात श्रेष्ठ अभिनेते डॉ. श्रीराम लागू अभिनित १० हिंदी मराठी चित्रपट लपलेले आहेत. शोधा पाहू.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| पिं | कि | ता | ब | नी | चो | र | नी |
| ज | टो | मा | घ | रों | दा | ह | र |
| रा | हा | ब | ट | र | स्व | ळ | म |
| र | गां | धी | आ | दौ | ल | त | म |
| झा | बो | री | द | ल | म | ग्रा | त |
| को | गो | पा | ल | त | श | म | रं |
| ळ | चे | न्न | सु | त्रा | क्ती | ल | ग |
| र | कां | दा | दा | मा | द | ऋ | षी |

## शब्दखेळ - २०७ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ऑ | प | जे | रो | दा | ने | त | म |
| डी | म | ड | ली | पु | कि | हुं | र्सि |
| ऑ | फो | र्स | न्फो | ला | स | दा | डी |
| या | ली | झ | रो | व | सा | ई | ज |
| म | पो | र्श | तो | डे | इ | इ | डा |
| हा | सो | या | बी | न | च | ती | वो |
| फु | दा | ल | वि | ए | र | ळ | ल्व्हो |
| ल | टा | टा | र्ण | हे | के | न | ल |

# मॅथेमॅटिकल ऑलिम्पियाडमध्ये भारतीय विद्यार्थ्यांची ऐतिहासिक सुवर्ण कामगिरी

जगाला शून्याचा शोध लावून देणारा आणि संपूर्ण अंकशास्त्रालाच वेगळे वळण लावणारे आर्यभट्ट सारखे थोर गणिततज्ञ हे आपल्या भारताचे होते अर्थात म्हणूनच आपल्या देशातील गणितात प्रचंड हुशारी दाखविणारे गणिततज्ञ विद्यार्थी हे आर्यभट्टांचा वारसा जगाला सांगणारच नाही का? याचेच ताजे उदाहरण म्हणजे अलीकडेच युनायटेड किंगडममध्ये ११ जुलै रोजी पार पडलेल्या इंटरनॅशनल मॅथेमॅटिकल ऑलिम्पियाड स्पर्धेत आपल्या भारतीय गणितज्ञ विद्यार्थी चमूने आपली गणितातली हुशारी जगाला दाखवून देत चक्क ४ सुवर्ण पदक मिळवत ऐतिहासिक कामगिरी केली आहे आणि जगाच्या पाठीवर आपल्या देशाचा झेंडा अभिमानाने आम्ही हुशार गणिततज्ञ म्हणून फडकवलेला आहे. बाथ युनायटेड किंगडम येथे संपन्न झालेल्या या आंतरराष्ट्रीय गणिती ऑलिम्पियाड स्पर्धेत जगभरातील विविध देशातील एकूण ६०९ विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता ज्यामध्ये ५२८ पुरुष तर ८१ महिलांचा सहभाग




होता. या स्पर्धेत भारताच्या चमूने ४ सुवर्णपदक पटकावली यामध्ये महाराष्ट्रातील पुण्यातील आदित्य व्यंकट, आसाम गुवाहाटीच्या आनंदा भादुरी, उत्तर प्रदेश नोएडाच्या कनवं तलवार आणि मुंबईच्या ऋषील माथूर या विद्यार्थ्यांनी सुवर्ण पदकावर नाव कोरले. तर दिल्लीच्या अर्जुन गुप्ता आणि पुण्याच्या सिद्धार्थ चोप्राने रौप्य पदक मिळवले. या स्पर्धेतील सहभागी भारतीय विद्यार्थ्यांना आयआयटी मुंबईचे गणित विभागाचे प्रमुख प्रा. कृष्णन शिव सुब्रमण्यन, एचबीसीएसई मुंबईचे अल्पकालीन अभ्यागत गणिततज्ञ डॉ. राजुल सैनी, सीएमआय चेन्नई येथील पदवीधर आणि एमआयटी यामध्ये पीएचडी करणारे रोहन गोयल, बेंगळुरूच्या इंडियन स्टॅटिकल इन्स्टिट्यूटचे पोस्ट डायरेक्टर डॉ. मेनक घोष रोहन आणि राजुल सैनी हे दोघे ऑलिम्पियाड स्पर्धेचे माजी पदक विजेते आहेत. या गणिततज्ञांचे मार्गदर्शन लाभले. या स्पर्धेत भारतीय विद्यार्थ्यांचा संघ १९८९ पासून सहभागी होत असून आजवरच्या सर्व प्रवासातील यंदाची भारतीय गणिततज्ञ विद्यार्थ्यांची ही ऐतिहासिक सुवर्ण कामगिरी आहे. या सुवर्ण कामगिरीबद्दल नुकताच मुंबईतील अणुशक्ती नगर येथील एचबीसीएसइ या संस्थेत सुवर्णपदक विजेत्या स्पर्धकांचा सन्मान करण्यात आला. जागतिक गणित ऑलिम्पियाडमध्ये आपल्या देशाचे नाव सुवर्णाक्षरात कोरणाऱ्या या विद्यार्थ्यांना मनापासून सलाम. ब्राव्हो इंडिया.

अक्षरधारा

लोकजागर

संकलन-संयोजन
सुबोध रणशेवरे
subodh.ranshevre rediffmail.com

# मराठा प्रसारक समाजाच्या वांबोरी महाविद्यालयास मान्यता

**समाचार/नगर-दि.२५**

महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग मुंबई यांनी अहमदनगर जिल्ह्यातील शैक्षणिक क्षेत्रात नवजलेल्या अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज या संस्थेच्या वांबोरी ता. राहुरी येथील यशवंतराव चव्हाण कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयास मान्यता दिली आहे.

वांबोरी गावाचे भूमिपुत्र अहमदनगर जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष आणि अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे माजी उपाध्यक्ष कै. रामनाथ वाघ यांनी पाहिलेल्या स्वप्नाची आज पूर्ती झाली आहे.

वांबोरी येथील या नवीन महाविद्यालयाच्या मान्यतेसाठी संस्थेचे अध्यक्ष श्री रामचंद्र दरे. उपाध्यक्ष, डॉ. विवेक भापकर, सेक्रेटरी अडवोकेट विश्वासराव आठरे, सहसचिव श्री जयंत वाघ, खजिनदार एडवोकेट दीप लक्ष्मी म्हसे व संस्थेचे सर्व विश्वस्तांनी शासन स्तरावर प्रयत्न केले. तसेच या महाविद्यालयाकरिता लागणारी पाच एकर जमीन एडवोकेट सुभाषराव पाटील यांनी संस्थेस विना मोबदला बक्षीस पत्र म्हणून दिली आहे.



# आयएमएस ग्रंथालयाला 'अ' ऑडिट वर्ग

**समाचार/नगर-दि.२५**

बी.पी.एच.ई. सोसायटीच्या इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीजने लर्निंग रिसोर्स सेंटरच्या ग्रंथालयाचे अंतर्गत आणि बाह्य ऑडिट (शैक्षणिक वर्ष २०२१-२४) केले गेले. या ऑडिटमध्ये प्रशासकीय आणि शैक्षणिक माहिती, ग्रंथालय सेवा, लायब्ररी पायाभूत सुविधा आणि संशोधन उपक्रम निकषांचा समावेश करण्यात आला आणि त्यावर लक्ष केंद्रित करण्यात आले. डॉ. दत्तात्रय काळबांडे, ग्रंथपाल जे. वतुमुल्ल साधुबेला गर्ल्स कॉलेज, उल्हासनगर यांनी तयार केलेल्या लायब्ररी ऑडिट फॉरमॅटनुसार दुसऱ्यांदा ऑडिट करण्यात आले. प्रशासकीय व शैक्षणिक माहितींचे नियम वापर करता केंद्रीत सेवा संगणकीयकरण, तंत्रज्ञानाचा वापर, पायाभूत सुविधा इ. निकशांवर करण्यात आलेल्या ऑडीटमध्ये ग्रंथालयाला 'अ' वर्ग प्रदान करण्यात आला.

समितीचे अध्यक्ष डॉ. दत्तात्रय काळबांडे , सदस्य डॉ. मनीषा एन. जाधव आणि प्रा. प्रकाश पी. कोकणे होते.संचालक डॉ. एम.बी. मेहता आणि डॉ. विक्रम बर्नाबास यांनी लेखापरीक्षकांचे स्वागत करून त्यांचा सत्कार केला. त्यांनी ग्रंथपाल डॉ. स्वाती बर्नाबास आणि ग्रंथालय कर्मचारी जितिन आढाव, सिराज मुलाणी, कृष्णाकुमारी थोरे, राजेश कांबळे आणि रजिया शेख यांनी या कामी विशेष परिश्रम घेतले. शरयू कुलकर्णी, कार्यालयीन अधीक्षक आणि प्रशासन विभागातील कर्मचारी आणि नरेंद्र कदम, लेखापाल आणि लेखा विभागातील कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

# खा. लंके यांच्या उपोषणास 'जन आक्रोश'चा पाठिंबा

**समाचार/नगर-दि.२५**

जिल्हा पोलीस दलातील गैरकारभाराविरोधात खासदार निलेश लंके यांचे जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालया समोर तिसऱ्या दिवशी उपोषण सुरु आहे. या उपोषणात भ्रष्टाचार विरोधी जन आक्रोशच्या पदाधिकाऱ्यांनी सक्रीय सहभाग नोंदवून उपोषणास पाठिंबा दिला.

संघटनेचे प्रदेशाध्यक्ष रघुनाथ आंबेडकर यांनी पाठिंब्याचे पत्र खासदार लंके यांना दिले. यावेळी अनंत गारदे, अशोक रोहोकले, संघटनेचे जिल्हाध्यक्ष योगेश कुलथे, दीपक साळवे, अनिल पठारे, बाबासाहेब महापुरे, बाबासाहेब डोळस आदी पदाधिकारी उपस्थित होते. रघुनाथ आंबेडकर यांनी अहमदनगर जिल्हा पोलीस दलातील गैरकारभाराने जनता वैतागली आहे. सामान्य जनतेला हप्तेखोरीचा त्रास सहन करावा लागत असून, हे उपोषण सर्वसामान्य जनतेच्या



मनातील उद्रेक आहे. या उपोषणामुळे पोलीस खात्यातील भ्रष्टाचार उघडकीस येत आहे. लंके यांच्या या उपोषणाने सर्वसामान्यांना न्याय मिळण्यास मदत होणार असल्याची भूमिका त्यांनी व्यक्त केली.

# शैक्षणिक किटमुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर फुलले समाधानाचे हास्य

**समाचार/नगर-दि.२५**

लायन्स क्लब ऑफ अहमदनगर, लिओ क्लब ऑफ अहमदनगर व घर घर लंगर सेवा यांच्या संयुक्त विद्यमाने सारसनगर येथील कै. दामोदर विधाते (मास्तर) हायस्कूलमध्ये पन्नास मुला-मुलींना शैक्षणिक साहित्याच्या किटसह स्कूल बॅगचे वाटप करण्यात आले.

शैक्षणिक साहित्य वाटपाच्या उपक्रमाप्रसंगी लायन्सच्या अध्यक्षा डॉ. अनघा पारगावकर, सचिव डॉ. सिमरन वधवा, खजिनदार अंजली कुलकर्णी, घर घर लंगर सेवाचे जनक आहुजा, कैलाश नवलानी, मुख्याध्यापक शिवाजी म्हस्के आदी उपस्थित होते. डॉ. पारगावकर, डॉ. सिमरन वधवा यांची भाषणे झाली. किटमध्ये दप्तर, चार नोटबुक व कंपासचा समावेश आहे. नवीन शैक्षणिक साहित्य मिळाल्याने शालेय विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य फुलले होते. विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने राबविलेल्या उपक्रमाबद्दल मुख्याध्यापक शिवाजी म्हस्के यांनी आभार मानले.

# बाबा अमरनाथांच्या गुहेतील पवित्र घंटा नगरमध्ये

**समाचार/नगर-दि.२५**

नगरचे भाविक अमरनाथ येथील गुहेत बाबा बर्फानी यांचे दर्शन घेत असतानाच गुहेत पिंडी समोरील लावलेली एका घंटा निखळते व ती थेट नगरचा भाविक दर्शन बोरा याच्या हातात पडते. बाबा बर्फानीच्या दर्शनाचा अनोखा प्रसाद दर्शनला मिळाला आहे. नगरहून अमरनाथला गेलेल्या शिव मित्र प्रतिष्ठानच्या सदस्यांनी मोठ्या आनंदाने व भक्तिभावाने बाबांनी दिलेला घंटा रुपी प्रसाद नगरला आला आहे. ती घंटा शहरातील गंजबाजार येथील श्री सोमेश्वर महादेव मंदिरात गुरूवर्य राजाभाऊ कोठारी यांच्या हस्ते महाआरती करून लावण्यात आली.



या चमत्कारी घटनेबाबत माहिती देताना सुमित वर्मा म्हणाले, नगरच्या शिव मित्र प्रतिष्ठानचे सदस्य दरवर्षी नित्याने बाबा अमरनाथ दर्शन यात्रा करीत आहेत. या वर्षीच्या माझ्यासह दर्शन बोरा, साहिल सोनसळे, रोहित सोनेकर, निर्भय पिडीआर, पियूष अग्रवाल, प्रयाग मगर, मोहित वर्मा, राहुल वर्मा, राहुल मेहेर, श्रवण बोरा, शिवम सानपव यश सावेकर हे सर्वजण गुहेत बाबा अमरनाथांचे दर्शनासाठी उभे असताना अचानक एक चमत्कार घडला गुहेत वर लावलेली एक पवित्र घंटा निखळून दर्शन बोरा याच्या हातात पडली. बाबा बर्फानीच्या दर्शनाचा अनोखा प्रसाद यावर्षी आम्हाला मिळाला आहे. ही प्रसाद रुपी घंटा अहिल्यानगरला आणण्याचे भाग्य लाभले आहे, ही पवित्र घंटा आम्ही मोठ्या आनंदाने व भक्तिभावाने सोमेश्वर महादेव मंदिरात शहरातील भाविकांच्या दर्शनासाठी लावली आहे.

राजाभाऊ कोठारी यांचेही भाषण झाले. यावेळी उद्योजक सुभाष कायगावंकर, आनंद नांदुरकर, संकेत गुरव, अमित लड्ढा, मयुर जाधव, यश मुथ्था, प्रसाद भोसले, अनमोल कांकरिया, रमेश शहाणे व शिव मित्र प्रतिष्ठानचे सभासद उपस्थित होते.



# अरिहंत फार्मसीला 'उत्तम कॉलेज'चा दर्जा

**समाचार/नगर-दि.२५**

सोनेवाडी रोडवरील अरिहंत फार्मसी'ला महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ मुंबई यांनी केलेल्या परिक्षणातून कॉलेजला उत्तम कॉलेज' असा दर्जा प्राप्त झाला आहे. दरवर्षी होणाऱ्या परिक्षणातून कॉलेजला शिक्षणासाठी दर्जा दिला जातो, अशी माहिती प्राचार्य योगेश बाफना यांनी दिली.

कॉलेजमधील भौतिक सुविधा, उत्तम शिक्षण पद्धती, अनुभवी शिक्षक वर्ग, ग्रंथालयातील सोयी सुविधा, विद्यार्थ्यांचा सर्वांनी विकासासाठी राबवण्यात येणार्या सर्व उपक्रम जसे पोस्टर प्रेझेंटेशन, प्रश्नमंजुषा, मॉडेल मेकिंग अशा अनेक गोष्टी तपासल्या जातात. या सर्वच गोष्टींमध्ये अरिहंत कॉलेज नेहमीच अग्रेसर ठरले. या यशामध्ये प्रा.माधुरी पवार, प्रा. शितल खंडागळे, प्रा. रुचिता पवार, प्रा. प्रतीक्षा गांधी, प्रा. वृषाली गायकवाड आदिंसह प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# नगर सीए शाखेतर्फे जागतिक युवा कौशल्य दिन साजरा



**समाचार/नगर-दि.२५**

इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडियाच्या कौशल्य संवर्धन समितीच्या वतीने युवा कौशल्य (स्कील) सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. त्या अनुषंगाने अहमदनगर शाखेतर्फे नुकताच युवा सीएकरिता जागतिक युवा कौशल्य दिन साजरा करण्यात आला होता.

नगर शाखेचे अध्यक्ष सीए सनित मुथा यांनी उपस्थितांचे स्वागत करून, कौशल्य संवर्धन या संबधी माहिती दिली. इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडियाच्या वतीने हा खूप चांगला उपक्रम हाती घेतला असून याद्वारे युवा सीएना याचा खूप लाभ होणार आहे. या कार्यक्रमांचा उद्देश युवकांना कौशल्य विकास आणि उपलब्ध असलेल्या संधीची माहिती देणे हा आहे, तसेच या वर्षी सीए झालेल्या विद्यार्थ्यांना सीए पास झाल्यानंतरच्या संधी व त्याकरिता लागणाऱ्या कौशल्य या संदर्भात माहिती देण्यात आली. या कार्यक्रमात सीए रोहित बोरा, सीए आयुषी कासवा, सीए अमरनाथ देशमुख यांनी संवाद कौशल्य प्रेझेन्टेशन स्कील्स, भाषण कौशल्य तसेच आर्थिक कौशल्याविषयी माहिती दिली.

या कार्यक्रमाकरिता युवा सीए मोठ्या प्रमाणात हजार होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नगर सीए शाखेच्या विद्यमान कार्यकारिणीचे सदस्य सर्वश्री सीए सनित मुथा, सीए प्रसाद पुराणिक, सीए अभयकुमार कटारिया, सीए महेश तिवारी, सीए ज्ञानेश्वर काळे, सीए पवनकुमार दरक परिश्रम घेतले.

# राष्ट्रवादी युवकच्या शहर विधानसभा अध्यक्षपदी गुंजाळ

**समाचार/नगर-दि.२५**

राष्ट्रवादी युवक काँग्रेस पार्टीच्या शहर विधानसभा अध्यक्षपदी सागर गुंजाळ यांची निवड जाहीर करण्यात आली असून त्यांना निवडीचे पत्र पक्षाचे अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते देण्यात आले,



यावेळी माजी आ.अरुण जगताप, आ.संग्राम जगताप, युवकचे प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण आदी उपस्थित होते. उपमुख्यमंत्री पवार म्हणाले की, राजकारणात उच्च शिक्षित युवकांनी येवून समाजातील प्रश्न समजावून घेत ते सोडवण्याचे प्रयत्न केल्यास नक्कीच शेवटच्या घटकांपर्यंत शासनाच्या योजना पोहचतील, व राजकारणातून समाज घडवण्याचे काम होईल तसेच या माध्यमातून नागरिकांचा विश्वास संपादन होईल, आ. संग्राम जगताप यांच्या माध्यमातून शहर विकासासाठी मोठा निधी उपलब्ध करून दिला असून त्याची माहिती राष्ट्रवादी युवक काँग्रेस पार्टीच्या वतीने नागरिकांच्या घरांपर्यंत पोहचवावी असे ते म्हणाले. आ.जगताप यांचेही भाषण झाले. माझ्यावर राष्ट्रवादी युवक काँग्रेस पार्टीच्या शहर विधानसभा अध्यक्षपदाची जबाबदारी सोपवण्यात आली, त्या माध्यमातून युवकांचे संघटन करून पक्षाचे ध्याय धोरणे समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहचवण्याचे काम केले जाईल, असे गुंजाळ यांनी निवडीनंतर स्पष्ट केले.

# जिल्हा वाचनालयात ४ ऑगस्टला चित्रकला स्पर्धा

**समाचार/नगर-दि.२५**

अहमदनगर जिल्हा वाचनालयाच्यावतीने दरवर्षी प्रमाणे इ.२ री ते इ.४ थी व ५ वी ते ६ वी च्या मुला-मुलींसाठी रविवार दि.४ ऑगस्ट रोजी चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा दोन गटात होणार आहे, अशी माहिती वाचनालयाचे अध्यक्ष प्रा.शिरिष मोडक, प्रमुख कार्यवाह विक्रम राठोड यांनी दिली.



जिल्हा वाचनालयाच्या वतीने घेण्यात येणारी ही स्पर्धा बाई इचरजबाई फिरोदिया प्रशाला, नवीपेठ येथे दि. ४ रोजी सकाळी १० ते ११.३० या वेळेत घेण्यात येईल. स्पर्धकांना चित्रे काढण्यासाठी कागद आयोजकांतर्फे देण्यात येईल. चित्रे काढून रंगवण्यासाठी आवश्यक इतर साहित्य प्रत्येकाने स्वत: आणावयाचे आहे. स्पर्धेसाठी प्रवेश शुल्क रु. १० असून, त्याची नाव नोंदणी शनिवार दि.३ ऑगस्ट पर्यंत वाचनालयात करावी.गट क्र.१ इ.२ री ते ४ थी साठी विषय माझा आवडता गणपती बाप्पा, स्कूल बस, पोलिस. गट क्र.२ इ.५वी व ६ वी साठी विषय - भारतीय सैनिक, दिंडी. करोडपतीमध्ये मी व अमिताभ बच्चन. वरील विषय देण्यात आलेले आहेत.

चित्र रंगवण्यासाठी मुलांनी तेलकट खडू, स्केचपेन किंवा रंगीत पेन्सिल याचाच वापर करावा. स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ सोमवार दि.१२ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वा. जिल्हा वाचनालयात करण्यात येईल.

# एव्हरेस्ट ॲबॅकस ॲकॅडमीची राष्ट्रीय स्पर्धा संपन्न

**समाचार/नगर-दि.२५**

येथील एव्हरेस्ट बॅकस ॲकॅडमीच्या वतीने २६व्या नॅशनल लेवल कॉम्पिटिशनचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमास एशियन नोबेल रमण मॅगसेसे पुरस्कार विजेत्या पद्मश्री नीलिमा मिश्रा, राज्याचे शिक्षण उपसंचालक रमाकांत काठमोरे, जिल्हा मराठा विद्याप्रसारक समाज संस्थेचे विश्वस्त वसंतराव कापरे, सहाय्यक पो. नि. माणिक चौधरी, चित्रपट अभिनेते डॉ. सुरेश शिंदे, बालमनोविकार तज्ज्ञ तेजस्विनी आहेर, उद्योजक संदीप गडाख, जिल्हा प्राथमिक शिक्षक सहकारी बँकेचे संचालक महेंद्र भणभणे उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एव्हरेस्ट बॅकस ॲकॅडमीचे संस्थापक अशोक कार्ले होते. पाच मिनिटांची होती. पाच मिनिटांत आराध्या साबळे



हिने १७९, तर जयेश निंबाळकर याने १५७ बेरीज आणि वजाबाकी केले. अवधूत पालवे यांनी मोठ्या संख्येचे १२५ गुणाकार करून चॅम्पियन ऑफ चॅम्पियनचा मानकरी ठरला, तर इशान नितीन सब्बन याने १७३ गुणाकार केले. श्रावणी राजकुमार पवार हिने १४३ भागाकार, दिव्या डोळस याने ११६ संख्यांचे वर्ग करून चॅम्पियनपद मिळवले. यावर्षीचे बेस्ट टीचर अनुजा तांबे, रेणुका दिघोळकर, शीतल गोंधळी, भारती डौले यांना घोषित करण्यात आले, तर पूनम सोनवणे यांना स्टार टीचर म्हणून गौरविण्यात आले.

समर्थ बुधवंत, ओंकार दौंड, प्रदुषा देशमुख, मनीष नकाते, प्रेमराज थोरवे या ५ विद्यार्थ्यांना बॅकस मास्टर ही पदवी प्रदान केली. यावर्षी ॲकॅडमीचे महाराष्ट्रात सर्व सेंटर मिळून तब्बल ९ हजार ३०० विद्यार्थी परीक्षेला बसले. नगर येथे ८५ शाखांमधून १९१० विद्यार्थी स्पर्धेला उपस्थित होते. आराध्या कातोरे, श्रेयस देहरिया, स्मितल काळे, ज्ञानेश्वरी चन्ने, हृदयी गोरे, स्नेहल काळे, अवनी बारसे, वेदिका शेजाळ, ऋषभ नागरगोजे, सिद्धी चेमटे, वरद दळवी, पार्थ खेडकर, वेदांत विधाते, स्वराज चव्हाण, संग्राम बेरड यांनी विजेतेपद पटकावले, तर मोठ्या गटात शिवराज मेटे, श्रेया भोसले, प्रिया राऊत, युवराज ढवळे, समर्थ झिपुर्डे, सुयश आमले, अथर्व हारदे, आर्या हिंगे, ओंम गवांदे, कार्तिक तांबे, कृष्णा कोळकर, समृद्धी गोरे, संस्कृती जगताप, सोनू अहिरे, आदित्य पवार, श्रावणी पवार, कुणाल डोळस, मनीषा नकाते हे विद्यार्थी चॅम्पियन ठरले.

# आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये ऑगस्ट महिन्यात मोफत तपासणी शिबीर



समाचार/नगर-दि.२५

राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज यांच्या १२४ व्या जन्मजयंतीनिमित्त जैन सोशल फेडरेशन संचालित आनंदऋषीजी हॉस्पिटल अ‍ॅण्ड हार्ट सर्जरी सेंटर येथे दि.२ ऑगस्ट ते दि. ३१ ऑगस्ट २०२४ या कालावधीत विविध मोफत आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज यांची मानवसेवेची शिकवण व प्रबुध्द विचारक आदर्शऋषीजी म.सा.यांच्या प्रेरणेतून हे शिबिर घेण्यात येत आहे. दररोज सकाळी १० ते दुपारी २ या कालावधीत रूग्ण तपासणी करण्यात येणार आहे. आनंदऋषीजी हॉस्पिटलला एन.ए.बी.एच.मान्यता मिळालेली असून ही मान्यता असलेले नगर जिल्ह्यातील २६० बेडस्‌चे हे पहिलेच हॉस्पिटल आहे. हॉस्पिटलमधील उच्च दर्जाच्या आरोग्य सेवांचा लाभ या मोफत शिबिरांतून सर्वसामान्य रूग्णांना होणार आहे. हॉस्पिटलमध्ये प्रशस्त व अतिप्रगत पॅथॉलॉजी विभाग, आंतरराष्ट्रीय दर्जाची ब्लड बँक, ३५ अत्याधुनिक डायलेसिस मशिन विभाग, परिपूर्ण फिजिओथेरपी विभाग आहे.

- दि. २ ऑगस्ट– सर्व प्रकारचे कॅन्सर, स्त्रियांची कॅन्सर तपासणी
- दि. ४ ऑगस्ट– पोटाचे आजार तपासणी
- दि. ९ ऑगस्ट– कान, नाक, घसा, स्पीच थेरपी तपासणी
- दि. १० ऑगस्ट– दंतरोग तपासणी व उपचार
- दि. ११ ऑगस्ट– नेत्ररोग तपासणी
- दि. १२ ऑगस्ट– बालरोग तपासणी
- दि. १४ ऑगस्ट– किडनी आजार तपासणी
- दि. १६ ऑगस्ट– एंडो युरोलॉजिकल (मूत्रपिंड, मूत्रमार्ग, मुत्राशय) स्टोन शस्त्रक्रिया प्रोस्टेट रोग उपचार.
- दि. १७ ऑगस्ट– अस्थिरोग तपासणी, मणके व सांधे बदली शस्त्रक्रिया
- दि. १९ ऑगस्ट– मेंदू विकार व मेंदू शस्त्रक्रिया
- दि. २१ ऑगस्ट– जनरल शस्त्रक्रिया
- दि. २३ ऑगस्ट– प्लॅस्टिक सर्जरी
- दि. २५ ऑगस्ट– हृदयरोग तपासणी
- दि. २७ ऑगस्ट– स्त्रीरोग, गर्भवती महिला आरोग्य तपासणी
- दि. २९ ऑगस्ट– मधुमेह, उच्चरक्तदाब, थायरॉईड ग्रंथीविकार तपासणी
- दि. ३१ ऑगस्ट– दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया

या शिबिरामध्ये प्रत्येक विभागाचे तज्ज्ञ डॉक्टर्स रुग्णांची तपासणी करणार आहेत. दरवर्षी राबविण्यात येणाऱ्या या शिबिराचा असंख्य रुग्णांना लाभ झाला आहे. या भव्य विविध मोफत आरोग्य तपासणी शिबिराला शुक्रवार दि.२ ऑगस्ट रोजी सुरूवात होणार आहे. या शिबिराची नाव नोंदणी व अधिक माहितीसाठी ०२४१-२३२०४७३/७४/७५ या दूरध्वनी क्रमांकावर अथवा ९४०४३९९९११ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन जैन सोशल फेडरेशनतर्फे करण्यात आले आहे.

# एच.यू.गुगळेमधील ट्रॅफिक जाम मान्सून सेलला ग्राहकांचा प्रतिसाद

समाचार/नगर-दि.२५

जामखेडसह राज्यात कपड उद्योगात प्रसिद्ध असलेल्या एच. यु. गुगळे क्लॉथ मर्चंटच्या दालनामध्ये सुरु असलेल्या ट्रॅफिक जॅम मान्सून सेलला ग्राहकांचा अभूतपूर्व असा प्रचंड प्रतिसाद मिळत असून सर्वच स्तरातील ग्राहकांनी कापड खरेदीसाठी उडी घेतली असल्याचे चित्र दिसत आहे.जामखेड शहरातील मध्यवर्ती असलेल्या एच. यु. गुगळे क्लॉथ मर्चंट व लक्ष्मी चौकातील लक्ष्मीपार्क या दोन्ही भव्य दालनामध्ये हा सेल सुरू राहणार आहे.

नामांकित कंपन्यांच्या विविध वस्त्रखरेदीसाठी नगर किंवा पुण्याला जाणारा युवा वर्ग व ग्राहकांची गरज ओळखून जामखेडमधील एच यु गुगळे क्लॉथने



वस्त्रविक्रीच्या जगात आपला स्वतंत्र ब्रॅण्डनेम तयार केला आहे. ग्राहकहित, सचोटी व माफक दर ही व्यवसायमूल्ये कायमच जपल्याने कापड दुकानात केवळ शहर आणि तालुक्यातीलच नव्हे, तर आसपाच्या तालुक्यातूनही विविध सण उत्सव किंवा शुभकार्यासह वर्षभरासाठी कापड खरेदी करणाऱ्या कौटुंबिक ग्राहकांची पावसाळी सेलसाठी मोठी गर्दी असते.आबालवृध्दांसाठी सर्व प्रकारच्या नामांकित कंपन्यांची वस्त्रे सर्व प्रकारच्या फॅशनेबल व डिझायनर साड्या नामवंत कंपन्यांचे सुटिंग, शटिंग, लहान मुले व युवक युवतींसाठी फॅशनच्या नवनवीन रेंज, नववधूसाठी शालू, दुल्हन साड्या, वरासाठी ब्लेझर्स, शेरवानी आदींच्या खरेदीसाठी जामखेड शहरातील दोन्ही वस्त्र दालनात लग्नाच्या बस्त्यासाठी विशेष सोय करण्यात आली आहे.


## जागा भाड्याने देणे

पाईपलाईन रोडटच वाणीनगर कमानी समोर दुकान व गोडाऊनसाठी जागा भाड्याने देणे आहे.

- संपर्क -
9975227823
8766516229

## घर विकणे आहे

प्रेमदान हडको घ.नं. अ 113

- मो.नं. -
9881869954




## पाचवे पुण्यस्मरण

स्व.सुरेश रामचंद्र जोशी
स्व.दि.२५/७/२०१९

सावली आम्हाला दिली वटवृक्षाप्रमाणे...
शिक्षा आम्हाला दिली अविरत सेवेची...
कर्तृत्व आम्हाला शिकवले स्वकष्टाचे...
आदर्श आम्हाला दिले सद्विचाराचे

आपल्या पावन स्मृतीस आमची भावपूर्ण आदरांजली

-दु:खांकित-
श्रीमती रजनी सुरेश जोशी
सौ.अनुजा-ओंकार सुरेश जोशी
सौ.दीपिका-अनिकेत सुरेश जोशी
कु.समृद्धी, कु.समर्था, कु.साक्षी.

**उप निबंधक सहकारी संस्था (परसेवा)**
**अहमदनगर जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशन लि., अहमदनगर**
**द्वारा – नगर अर्बन को ऑपरेटिव्ह बँक लि., अहमदनगर**
**टपाल पेटी क्र. ७, बँक रोड, अहमदनगर – ४१४ ००१.**

## – जाहीर समन्स –

अर्जदार बँक– दि यवतमाळ अर्बन को–ऑप. बँक लि., शाखा अ.नगर विरुद्ध जाब देणार

| अ. नं. | दावा क्रमांक | समन्स ज्याचेवर काढले त्याचे नाव | समन्स काढलेल्या इसमाची कर्जाची जबाबदारी जाब देणार नं. (१) | दावा रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | १०१/४४/२०२४ | श्री. अमोल अशोक डाके<br>प्लॉट नं. २५, २६, स.नं. ४५, २ए, ऑरेंज हॉस्पिटल जवळ, तपोवन रोड, अहमदनगर | प्रतिवादी नं. ३ | ५५,६८१.०० |

सदर दाव्याच्या कामी अर्जदार यांनी दाखल केलेल्या अर्जातील प्रतिवादींना रजिस्टर पोस्टाने समन्स पाठविण्यात आलेले आहेत. परंतु प्रतिवादींना समन्स रुजू न झाल्याने त्यांचा नवीन पत्ता उपलब्ध नसल्यामुळे सदरचे जाहीर समन्स देत आहोत. उपनिर्दिष्ट अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने तारीख १६/०८/२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता दाव्यासंबंधी कागदपत्रांसह आपण या न्यायालयात हजर रहावे.

या नोटीसद्वारे प्रतिवादींना असेही कळविण्यात येते की, वरील तारखेस आपण वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी. त्याचप्रमाणे वरील तारखेस अगर तत्पूर्वी आपला संपूर्ण पत्ता कळविण्यास कसूर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल. म्हणून आज दिनांक : १९/०७/२०२४ रोजी माझी सही व कार्यालयीन मुद्रेसह हा जाहीर समन्स दिला आहे.

सुनावणीचे ठिकाण–
उप निबंधक (सहकारी संस्था)
अहमदनगर जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशन,
द्वारा – नगर अर्बन को–ऑप. बँक लि.,
विस्तारीत इमारत, बँक रोड, पानसरे गल्ली, अहमदनगर–४१४००१

कोर्टाचा शिक्का

(दिलीप तिजोरे)
उपनिबंधक सहकारी संस्था (परसेवा),
अहमदनगर जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशन मर्या., अहमदनगर.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेली मिळकत ही श्री. गौरव राम त्र्यंबके, रा. दिल्लीगेट, अहमदनगर हे मूळ मालकाकडून विकत घेणार असून, त्याबाबत त्यांचा मूळ मालकाबरोबर करार झालेला आहे. सदर मिळकत ते टी. जे. एस. बी. सहकारी बँक मर्यादित, अहमदनगर यांच्याकडे तारण देऊन कर्ज घेण्याबाबत अर्ज केलेला आहे. आमचे अशिल टी. जे. एस. बी. सहकारी बँक मर्यादित, अहमदनगर यांनी सदर विद्यमान मालकांच्या कर्जाबाबतच्या अर्जाचा विचार करून त्यांना खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या मिळकतीबाबतचे मागील सर्व खरेदीखताचे अस्सल कागदपत्रे असता त्यांनी आमच्या अशिलास सांगितले की, राजीव दिलीप थापर यांनी अशोक शिवलाल गांधी यांचे नावे करून दिलेल्या अस्सल खरेदीखताची प्रत दस्त नं. ५६२६/२०११ दि. १५/०९/२०११ हे अस्सल खरेदीखत व त्या सोबत असणारी पावती ही गहाळ झालेली आहे व ती त्यांच्याकडे नाही. त्यामुळे या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, सदर दस्ताबाबत कोणाचाही कसलाही हक्क, अधिकार, हितसंबंध, कोणताही वाद चालू असल्यास अथवा गहाण, दान, बक्षीसपत्र, कर्ज, बँक बोजा, अव्वल जप्ती, भाडेकरार, साठेकरार, चार्ज, लीन, अगर इतर कोणताही वाद अथवा कोणाचाही सदर मिळकतीवर हक्क, तक्रार असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत योग्य ती कागदपत्रे खालील पत्त्यावर समक्ष आणून द्यावी व पोहोच घ्यावी अथवा रजिस्टर पोस्टाने कळवावे. पुढील कोणाचीही काही हरकत न आल्यास सदर गहाळ दस्ताबाबत कसलाही हक्क, अधिकार, हितसंबंध नाही, तसेच ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहेत ते त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत, असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीबाबत गहाणखताचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही, याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे परिशिष्ट** – मौजे जखणगाव येथील ग. नं. ३८२ चे क्षेत्र ० हे. ७१ आर. पो. ख. ० हे. ०८ आर. यापैकी नगर–कल्याण रोडलगतची पश्चिमेकडील बाजूची संपूर्ण जमीन तिचे क्षेत्र ३५.५ आर+पो.ख. ४ आर. अशी एकूण ३९.५ आर. सर्व वहिवाटीचे व इतर हक्कासह काहीएक राखून न ठेविता सर्व तदंगभूत वस्तूसह मिळकत.

**ॲड. प्रकाश नारायण हिवाळे**
ऑफिस : सर्व्हे नंबर ५३७, हातमपुरा, अहमदनगर


टीप : मुव्ही शो च्या वेळा बदलू शकतात

दिनांक – १९ जुलै ते २५ जुलै २०२४



| | |
|---|---|
| बॅड न्यूज | 7.30 AM<br>9.00 AM<br>10.15 AM<br>12.30 PM<br>4.30 PM<br>6.30 PM<br>9.15 PM<br>10.45 PM |
| कल्की (2D) | 9.00 AM<br>9.30 AM |
| कल्की (3D) | 1.00 PM<br>7.15 PM |
| सरफिरा | 3.30 PM |
| एक दोन तीन चार (मराठी) | 1.00 PM<br>6.45 PM |
| रंगाडा (मराठी) | 4.00 PM |

for screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher *
- Offer Vaild On Window Booking & Phone Booking
Ahmednagar's First & Most Luxurlous Cinematic Paradlse

AVAILABLE ON book my show CONNPLEX AVAILABLE ON book my show

3" Floor, Kohinoor Mall, Premdan chowk, Savedi, A. Nagar.
Mo. 6353564618 / 7790094001 / 7790094002


परिशिष्ट – १

## महाराष्ट्र शासन कृषी विभाग

उपविभागीय कृषी अधिकारी अहमदनगर यांचे कार्यालय
जाहिरात क्र.०१/२०२४–२५, दि. २०/०७/२०२४
पत्ता : उपविभागीय कृषी अधिकारी अहमदनगर कार्यालय, कृषी चिकित्सालय, भुतकरवाडी, सावेडी, अहमदनगर
ई–मेल– sdaomahemednagar@gmail.com दूरध्वनी/फॅक्स क्रमांक – फोन नं. ०२४१–२४३०८४५

**ई-निविदा सूचना क्र. - उ. वि. कृ. नगर/ब-१/२०२४-२५/03 सन २०२४/२०२५**

उपविभआगीय कृषी अधिकारी अहमदनगर हे प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाकडून पात्र वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून खालील मृद संधारणाच्या क्षेत्र/नाला उपचारांच्या कामाकरिता विहित नमुन्यातील निविदा ई–निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागविण्यात येत आहेत. निविदाबाबतची कागदपत्रे शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार उपविभागीय कृषी अधिकारी अहमदनगर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही.

**निविदेतील समाविष्ट कामांचा तपशील खालीलप्रमाणे आहे –**

| अ. क्र. | तालुका | गावाचे नाव | कामाचे नाव | गट क्र. | निविदा अंदाजित किंमत रक्कम (रु.) | कामे पूर्ण करण्याचा कालावधी | निविदा फी (रु.) | बयाणा रक्कम रु. | कंत्राटदाराचा नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पाथर्डी | हाकेवाडी, भिलवडे | कंपार्टमेंट बंडींग | १०/२, १४/१, १४/२ | ९११०८०/– | ३० दिवस | ५९०/– | ९११०/– | वर्ग १ अ ते ७ |
| २ | पाथर्डी | करोडी | संयुक्त गॅबियन बंधारा | १७, १८, १९ | १३२०५७३/– | ३० दिवस | ५९०/– | १३२०६/– | वर्ग १ अ ते ६ |
| एकूण | | | | | २२३१६५३/– | | | | |

ई–निविदा उपलब्ध कालावधी – दिनांक : २५/०७/२०२४ ते दिनांक : ०९/०८/२०२४
ई–निविदा उघडणे – दिनांक १२/०८/२०२४

खाली ई–निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे. – १. http://mahatenders.gov.in
(सदर निविदे सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)
२. उपविभागीय कृषी अधिकारी अहमदनगर कार्यालयातील सूचना फलक.
(जिमाका/नगर/जाहि/०४३/२०२४–२५)

उपविभागीय कृषी अधिकारी
अहमदनगर

## जाहीर निविदा नोटीस

ग्रामपंचायत **मौजे मजले चिंचोली, ता. नगर** जि. अ. नगर यांच्याकडून जाहीर निविदा नोटीसद्वारे कळविण्यात येते की, ग्रामपंचायत **मौजे मजले चिंचोली, ता. नगर** अंतर्गत खालील काम करण्यासाठी सिलबंद लिफाफ्यात ब–१ निविदा मागवण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची रक्कम | कामाचा वर्ग | कालावधी | निविदा विक्री रक्कम | योजना |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | मौजे मजले चिंचोली, ता. नगर येथे ग्रामपंचायत इमारत विस्तार करणे, ता. नगर | ५,००,०००/– | सु.बे. | ६ महिने | २३६/– | ज.सु.वि.अ. |

निविदा फॉर्म व कामाच्या शर्ती व अटी याबाबतची माहिती ग्रा. पं. कार्यालयात **दि. २५/०७/२०२४ ते ३१/०७/२०२४** या कालावधीत कार्यालयीन वेळेत (सुट्टीचा दिवस सोडून) मिळतील. सिलबंद निविदा **दि. ३१/०७/२०२४** रोजी सायं. ५ वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील. सदर निविदा **०१/०८/२०२४** रोजी सकाळी ११ वा. उघडण्यात येतील. त्याबाबत अटी व शर्तींबाबत माहिती ग्रा. पं. **मजले चिंचोली, ता. नगर** येथे उपलब्ध आहे. निविदा स्वीकारण्याचा अगर नाकारण्याचा अधिकार सरपंच/उपसरपंच/ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय **मजले चिंचोली, ता. नगर** येथे पार पडेल. तांत्रिक लिफाफा व आर्थिक लिफाफा स्वतंत्र असावा. सर्व कामांच्या शासकीय नियमानुसार सर्व कपाती केल्या जातील. कामाचे देय काम पूर्ण झाल्यानंतर मोजमाप पुस्तिकेत नोंद होऊन काम पूर्णत्वाचा दाखला मिळाल्यानंतर देण्यात येईल. कामावर तांत्रिक मार्गदर्शन उपअभियंता, पंचायत समिती **मजले चिंचोली, ता. नगर** यांचे राहील. निविदा मंजूर–नामंजूर करण्याचा अधिकार ग्रामपंचायत **मजले चिंचोली, ता. नगर** ने राखून ठेवला आहे. **आवश्यक प्रमाणपत्र** :– १) जि. प. नोंदणीप्रमाणपत्र, २) पॅनकार्ड, ३) जी. एस. टी. प्रमाणपत्र, ४) आधारकार्ड ५) सत्यप्रतिज्ञापत्र.

ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी/सरपंच
ग्रा. पं.मजले चिंचोली, ता.जि. नगर,

## ग्रामपंचायत बाभूळगाव खालसा, ता. कर्जत, जि. अहमदनगर

**ब–१ निविदा सूचना**

सरपंच/ग्रामसेवक, ग्रामपंचायत **बाभूळगाव खालसा, ता. कर्जत, जि. अहमदनगर** यांच्याकडून **सन २०२३–२४** या आर्थिक वर्षात **१५वा वित्त आयोग अंतर्गत** खालील कामांची ब–१ निविदा जि. प. अहमदनगर यांच्याकडील नोंदणीकृत संस्थाकडून एक लिफाफा पद्धतीने सिलबंद निविदा मागवित आहोत.

| अ. क्र. | कामाचे नाव | लेखाशीर्ष | कंत्राटदार | निविदा रक्कम | निविदा फी | बयाणा रक्कम | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे बाभूळगाव खालसा येथे घरगुती नळ कनेक्शन घेणे, ता. कर्जत | १५वा वित्त २०२३–२४ | सु. बे. | ३,२१,९३८ | ५९० | सूट | ६ महिने |
| २ | मौजे बाभूळगाव खालसा येथे गावठाण अंतर्गत आर. सी. सी. गटार करणे, ता. कर्जत | १५वा वित्त २०२३–२४ | सु. बे. | २,४५,४६२ | २३६ | सूट | ३ महिने |
| ३ | मौजे बाभूळगाव खालसा येथे व्यावसायिक गाळे दुरुस्ती करणे, ता. कर्जत | १५वा वित्त २०२३–२४ | खुला | १,७२,१५२ | २३६ | १७२१ | ३ महिने |
| ४ | मौजे बाभूळगाव खालसा येथे ग्रामपंचायत कार्यालय दुरुस्ती करणे, ता. कर्जत | १५वा वित्त २०२३–२४ | खुला | १,६५,०३५ | २३६ | १६५० | ३ महिने |
| ५. | मौजे बाभूळगाव खालसा येथे बोअरवेल घेणे व पाणी टाकी बांधणे, ता. कर्जत | १५वा वित्त २०२१–२२ | म.स.सं. | ७९,८६६ | २३६ | सूट | ३ महिने |

१. उपरोक्त कामाबाबत निविदा अटी व शर्ती इ.बाबतचा तपशील निविदा संचामध्ये नमूद केलेला असून, कोरे निविदा संच **दि. २५/०७/२०२४ रोजी १२.०० वाजेपासून दि. ०२/०८/२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत** ग्रामपंचायत कार्यालयात रोखीने अथवा धनादेशाने भरणा करून उपलब्ध आहे.
२. परिपूर्ण भरलेल्या निविदा ग्रामपंचायत कार्यालयात **दिनांक २५/०७/२०२४ रोजी १२.०० वाजेपासून दि. ०२/०८/२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत** सादर करता येतील.
३. प्राप्त निविदा **दि. ०३/०८/२०२४ रोजी १२.०० वा.** ग्रामपंचायत कार्यालयात उघडण्यात येतील.
४. निविदा संदर्भातील सविस्तर माहिती ग्रा. पं. कार्यालयात पहावयास मिळेल.
५. निविदा अटी व शर्तीमध्ये बदल करणे, तसेच प्राप्त निविदापैकी एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचे सर्व हक्क निम्न स्वाक्षरीत राखून ठेवले आहेत.

**सोबत कागदपत्रे** :– १. जि. प. अहमदनगर नोंदणी २. पॅनकार्ड ३. जीएसटी ४.निविदा फी व बयाणा रक्कम भरलेली पावती ५. रु. १०० च्या स्टॅम्प पेपरवर परिशिष्ट–१ (दि. २८/११/२०१८ आणि ११/०५/२०२२ च्या शासन निर्णयानुसार) ६. परिपूर्ण भरलेला निविदा संच ७. दराचे प्रपत्र

**सरपंच/ग्रामसेवक**
ग्रामपंचायत बाभूळगाव खालसा, ता. कर्जत, जि. अहमदनगर


**डागा शांतीलाल डागा**
दाळमंडई/मार्केट यार्ड, अहमदनगर.
फोन नं. ७५८८११५१५७, ९८२२०८१४४०
शेंदूर, गुलाल, कुंकू, भंडारा, भाजकी (काळी) माती, क्रिस्ट्रल रांगोळी, कलर रांगोळी, मीठ, नुडल्स, बांधकामाची रांगोळी



**घरच्यासारखी वृद्ध/रुग्णसेवा**
वृद्धत्व–कॅन्सर–अपघात, शस्त्रक्रिया, स्मृतीभ्रंश इ. रुग्णांना घरच्यासारखी निवासी सेवा – शुश्रूषा. (सशुल्क)
**स्नेहदीप केंद्र**
केडगाव, अहमदनगर
9011020176
9011026483
7499980845
(सहयोग – स्नेहालय)

आपल्या उज्ज्वल भविष्यासाठी आजच गुंतवणूक करा
व्ही गार्डचा सोलार वॉटर हिटर घेऊन या..
वीज बिलात बचत करून आपले भविष्य सुरक्षित करा...




SS 304 L टँक
उत्तम दर्जचे PUF इन्सुलेशन
60 LS 5000 LPD उपलब्ध प्रेशराइज्ड मॉडेल्स उपलब्ध

देशात सर्वाधिक विक्री होणारे व्ही गार्ड सोलार वॉटर हिटर



V-GUARD
Solar Water Heater

(*अटी लागू)
– अधिकृत विक्रेते –
प्रोप्रा. मिलिंद गंधे
**आदित्य एन्टरप्रायजेस्**
गुलमोहोर रोड, सावेडी, अ. नगर. 9325103781